सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३३१ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनासाठी संयुक्त मोजणी

मुंबई : महाराष्ट्रातील दळणवळण सुविधा तसेच व्यावसायिक संधी आणि पर्यटनाला गती देणाऱ्या शासनाच्या महत्त्वाकांक्षी शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनासाठी संयुक्त मोजणी सुरू होणार आहे. शक्तिपीठ महामार्गाची लांबी ८०२ किलोमीटर एवढी आहे. या प्रकल्पाचा भूसंपादनासह खर्च सुमारे ८६ हजार कोटी रुपये आहे. विदर्भ आणि मराठवाड्याला कोकणमार्गे थेट गोव्याशी जोडणाऱ्या या प्रकल्पामुळे रस्तमार्गे होणारा प्रवास आणखी वेगवान होणार आहे.

राज्यातील तीन शक्तिपीठे, दोन ज्योतिर्लिंग, दत्तगुरुंची ५ धार्मिक स्थळे, पंढरपूरसह एकूण १९ तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या शीघ्रसंचार द्रुतगती महाराष्ट्र शक्तीपिठ महामार्गाची घोषणा सरकारने २०२४ मध्ये केली होती. या प्रकल्पासाठी साधारणत: ९३८५ हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे. हा महामार्ग महाराष्ट्रातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यातून पुढे कोकण द्रुतगती महामार्गास गोवा-महाराष्ट्र सरहद्दीवर जोडण्यात येणार आहे. यामुळे महाराष्ट्रातील प्रमुख शक्तीपीठ माहूर, तुळजापूर व कोल्हापूर, तसेच मराठीतील आद्यकवी मुकुंदराज स्वामींचे व जोगाई देवीचे अंबाजोगाई, औंढा नागनाथ व परळी वैजनाथ ही दोन

शक्तिपीठ महामार्ग : नकाशा अधिकृत नाही, फक्त माहिती देण्याच्या उद्देशाने तयार केला आहे.

ज्योतिर्लिंगे, महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले श्री विठ्ठल मंदिर पंढरपूर तसेच कारंजा (लाड), अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औंदुबर ही दत्तगुरुंची धार्मिक स्थळेही जोडण्याचे नियोजन आहे. नागपूर ते गोवा हा सद्य:स्थितीतील २१ तासांचा प्रवास साधारणतः ११ तासावर येईल, असे अपेक्षित आहे. तसेच २०२५ मध्ये या महामार्गाचे भूमिपूजन करुन २०३० मध्ये तो खुला करण्याचे नियोजन आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत (एमएसआरडीसी) या प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाणार आहे. ८०२ किमी लांबीच्या या प्रकल्पासाठी कोल्हापूर वगळून ११ जिल्ह्यांमध्ये संयुक्त मोजणी सुरू होणार असून, त्यासाठीचे शुल्क संबंधित कार्यालयांना आठवडाभरापूर्वीच जमा करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी गेल्या वर्षापासून भूसंपादनाची प्रक्रिया सुरू झाली होती. त्यासाठी १२ जिल्ह्यांमध्ये २७ भूसंपादन अधिकाऱ्यांची नेमणूकही करण्यात आली होती. मात्र, विधानसभा निवडणुकीपूर्वी कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी या प्रकल्पाला प्रखर विरोध केल्याने गेल्यावर्षी सप्टेंबरमध्ये भूसंपादनाची अधिसूचना सरकारने स्थगित केली होती. आता हा प्रकल्प पुन्हा हाती घेण्यात आला आहे. या महामार्गाच्या माध्यमातून केळझरचा गणपती, कळंबचा गणपती, सेवाग्राम, पोहरादेवी, माहुरगड शक्ततपीठ, सचखंड गुरुद्वारा, औंढ्या नागनाथ, परळी वैजनाथ, आंबाजोगाई शक्तिपीठ, तुळजापूर, पंढरपूर, अक्कलकोट, सांगलीतील औदुंबर दत्त मंदिर, नरसोबाची वाडी, जोतिबा देवस्थान, महालक्ष्मी मंदिर, संत बाळूमामा यांचे समाधिस्थान आदमापूर, कुणकेश्वर आणि पत्रादेवी ही देवस्थाने जोडली जाणार आहेत.

कृषी क्षेत्राचा गेल्या दशकात विकास झाला- पंतप्रधान

पंतप्रधान किसान सन्मान योजनेला ६ वर्षे पूर्ण

नवी दिल्ली : शेतीला बळकटी आणि शेतकऱ्यांना समृद्धी देणाऱ्या पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेला ६ वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी (झच् चेवळ) यांनी देशभरातील शेतकऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. गेल्या १० वर्षात आमच्या प्रयत्नांमुळे देशातील कृषी क्षेत्राचा वेगाने विकास झाला. आमचे प्रयत्न अन्नदात्यांसाठी आदर, समृद्धी आणि नवीन शक्ती देत आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासंदर्भात ट्विटरवर (एक्स) म्हंटले आहे की, 'पीएम किसान योजनेला ६ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल देशभरातील आपल्या शेतकरी बंधू-भगिनींना खूप खूप शुभेच्छा. आतापर्यंत सुमारे साडेतीन लाख कोटी रुपये त्यांच्या खात्यात पोहोचले आहेत. हे माझ्यासाठी खूप समाधान आणि अभिमानाची गोष्ट आहे. आमचा हा प्रयत्न अन्नदात्यांसाठी आदर, समृद्धी आणि नवीन शक्ती देत आहे.

गेल्या १० वर्षात आमच्या प्रयत्नांमुळे देशातील कृषी क्षेत्राचा वेगाने विकास झाला आहे. आपल्या लाखो लहान शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीमुळे बाजारपेठेतील त्यांची उपलब्धता वाढली आहे. यासोबतच शेतीचा खर्च कमी झाला आहे आणि त्यांचे उत्पन्नही वाढल्याचे पंतप्रधानांनी सांगितले

पंतप्रधान मोदींची लठ्ठपणाविरोधात मोहीम, १० सेलिब्रेटींना केले आवाहन

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लठ्ठपणाच्या विरोधात राष्ट्रव्यापी मोहीम सुरू केली आहे. नागरिकांनी वजन नियंत्रणात राखण्यासाठी पदार्थांमधील तेलाचा वापर मर्यादीत करावा. सध्या वापरता त्यापेक्षा १० टक्के कमी तेल वापरा. गरजेपुरतेच तेल पदार्थांसाठी वापरा. अती तेलकट खाणे टाळा आणि निरोगी राहा; असे आवाहन पंतप्रधान मोदींनी केले आहे. एकविसाव्या शतकातील आव्हानांना सामोरे जात प्रगती साधण्यासाठी आधी निरोगी राहणे आवश्यक आहे. निरोगी व्यक्ती प्रभावीरित्या प्रगतीच्या दिशेने प्रवास करू शकते तसेच या प्रगतीचे लाभ घेऊ शकते. या विचारातून पंतप्रधान मोदींनी लठ्ठपणाच्या विरोधात मोहीम सुरू केली आहे.

लठ्ठपणाच्या विरोधात जनजागृती मोहीम सुरू करण्याचा निर्णय पंतप्रधान मोदींनी घेतला आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून पंतप्रधान मोदींनी एक्स पोस्टद्वारे देशातील १० सेलिब्रेटींना टॅग करुन मोहिमेत सहभागी होण्याचे आणि जनजागृती करण्याचे आवाहन केले आहे. तसेच त्या १० जणांना त्यांच्या ओळखीतील प्रत्येकी १० जणांना टॅग करुन मोहिमेचा विस्तार करण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधान मोदींनी टॅग केलेल्यांमध्ये जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि महिंद्रा समुहाचे चेअरमन आनंद महिंद्रा यांचा समावेश आहे.

पंतप्रधान मोदींनी कोणाला टॅग केले आहे ?

महिंद्रा समुहाचे चेअरमन आनंद महिंद्रा, गायक - अभिनेते निरहुआ हिंदुस्तानी, ऑलिम्पिक पदकविजेती नेमबाज मनू भाकर, खेळाडू मीराबाई चानू, अभिनेता मोहनलाल, इन्फोसिसचे सहसंस्थापक नंदन निलकेणी, जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, अभिनेता आर. माधवन, गायिका श्रेया घोषाल, पद्मभूषण पुरस्काराने गौरविलेल्या राज्यसभेतील खासदार सुधा मूर्ती.

भारताचे अंतराळात शतक

नवी दिल्ली (वृत्तसंस्था): पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी 'मन की बात'च्या ११९ व्या भागात अंतराळ क्षेत्र आणि महिला शक्तीचा, आरोग्य अन एआय क्षेत्राचा उल्लेख केला. ते म्हणाले - सर्वत्र चॅम्पियन्स ट्रॉफी आणि क्रिकेटचे वातावरण आहे. क्रिकेटमध्ये शतकाचे वातावरण कसे असते हे सर्वांनाच माहिती आहे. भारताने अंतराळात केलेल्या शतकाचे वेगळे महत्त्व आहे. इस्रोच्या यशाची व्याप्ती वाढली आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, गेल्या महिन्यात देशाने इस्रोच्या १०० व्या रॉकेटचे प्रक्षेपण पाहिले. ही केवळ एक संख्या नाही, तर ती अंतराळ विज्ञानात दररोज नवीन उंची गाठण्याचा आपला संकल्प देखील प्रतिबिंबित करते.

देशांतर्गत घटनांसाठी भारताला दोष देणाऱ्या बांगलादेशची परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी केली कानउघडणी

नवी दिल्ली : देशांतर्गत घटनांसाठी भारताला दोष देणा-या बांगलादेशने भारतासोबत नेमके कसे संबंध हवे आहेत याचा निर्णय बांगलादेशने करावा, असे प्रतिपादन परराष्ट्रमंत्री सुब्रमण्यम जयशंकर यांनी केले आहे.

बांगलादेशकडून वारंवार दोन्ही देशांमधील सौहार्दाच्या वातावरणाला तडे देणारे प्रकार घडल्यानंतर जयशंकर यांनी थेट कानउघडणी करणारे हे वक्तव्य केले आहे.

बांगलादेशच्या तत्कालिन पंतप्रधान शेख हसीना यांनी देश सोडला आणि मोहम्मद युनूस सत्तेवर आल्यापासून भारत आणि बांगलादेशमधील संबंध तणावपूर्ण आहेत. तेथील हिंदूंच्या नरसंहारावर भारताने जोरदार आवाज उठवला आहे. त्याचवेळी बांगलादेशचे अंतरिम सरकार मात्र भारतासोबतचे संबंध बिघडवण्यात कोणतीही संधी सोडत नाही.

नुकतेच ओमानमध्ये भारतीय परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी बांगलादेशचे परराष्ट्र व्यवहार सल्लागार मोहम्मद तौहीद हुसेन यांची भेट घेतली होती. पण बांगलादेश सुधारत नसल्यामुळे या बैठकीनंतर सुमारे आठवडाभरानंतर परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी बांगलादेशच्या प्रतिकूल वर्तनाचा मुद्दा उपस्थित केला.यासंदर्भात जयशंकर म्हणाले की, बांगलादेशला ठरवावे लागेल की ते आपल्याशी ते कशा प्रकारचे संबंध ठेवू इच्छितात? बांगलादेशासोबतचा आमचा दीर्घ आणि विशेष इतिहास १९७१चा आहे.

बांगलादेश भारतासोबत चांगले संबंध हवे आहे असे म्हणू शकत नाही आणि दुसरीकडे तेथे होणाऱ्या देशांतर्गत घटनांसाठी भारताला जबाबदार धरत आहे. बांगलादेशच्या अंतरिम सरकारमधील कोणीही दररोज उभे राहून प्रत्येक गोष्टीसाठी भारताला दोष देऊ शकत नाही. याबाबतचा निर्णय बांगलादेशला घ्यायचा आहे, असे सुतोवाच जयशंकर यांनी केले.

द्विपक्षीय संबंधांमधील समस्यांमागे दोन पैलू आहेत. पहिला म्हणजे अल्पसंख्याकांवरील जातीय हिंसाचार. बांगलादेशात अल्पसंख्याकांविरुद्ध हिंसाचार सुरू आहे. त्याचा परिणाम आपल्या विचारांवर नक्कीच झाला आहे. हा एक मुद्दा आहे ज्यावर आपण बोलले पाहिजे. आणि दुसरे म्हणजे बांगलादेशचे राजकारण आहे. आता त्यांनीच ठरवावं की त्यांना आमच्याशी कसे संबंध ठेवायचे आहे?

मुरलीधर मोहोळांच्या निकटवर्तीयाला मारहाण; गुंड गजा मारणेसह टोळीवर मकोका

पुणे : भाजपा नेते आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या निकटवर्तीयाला मारहाण करणाऱ्या गजा मारणे टोळीच्या तीन आरोपींवर मकोका लावण्यात आला आहे, अशी माहिती पुणे पोलिसांनी दिली आहे. यासोबतच टोळीचा प्रमुख गजा मारणे याच्यावरही कठोर कारवाई केली जाणार असल्याचे पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले आहे.

कोथरूडमध्ये भरदिवसा हल्ला, आरोपींना धडा शिकवला

कोथरूड परिसरात भरदिवसा एका तरुणाला मारहाण करण्यात आली होती. या प्रकरणात पोलिसांनी तातडीने कारवाई करत मारणे टोळीशी संबंधित तिन्ही आरोपींना अटक केली. या गुन्हेगारांचा परिसरात धाक असल्याने नागरिक साक्षीदार होण्यास किंवा तक्रार करण्यास घाबरत होते. त्यामुळे पोलिसांनी कठोर भूमिका घेत या आरोपींना कोठडीची मागणी न्यायालयात केली, आणि प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस.एच. वानखेडे यांनी पोलिस कोठडी मंजूर केली.

गुन्हेगारी टोळीला मोठा धक्का

या तिन्ही आरोपींना कोथरूड पोलिसांनी चांगलाच हिसका दाखवत या आरोपींना धडा शिकवत त्यांची धिंड काढली. आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. या आरोपींवर खुनाच्या प्रयत्नाचा अतिरिक्त आरोप दाखल करण्यात आला असून पुणे पोलिसांनी ही कारवाई गजा मारणे टोळीला मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे. आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले की, टोळीच्या नेस्तनाबूत करण्यासाठी पोलिसांची कठोर भूमिका राहील.

गजा मारणे टोळीवरील पुढील कारवाई

पोलिसांच्या रडारवर सध्या टोळीतील २७ जण आहेत. याशिवाय टोळीप्रमुख गजा मारणे याच्यावरही कठोर कारवाई केली जाणार आहे. या गुन्हेगारांची आर्थिक बाजू कमकुवत करण्यासाठी त्यांची मालमत्ता व वाहनांची माहिती डीडीआर आणि आरटीओकडून मागवण्यात आली आहे, असे आयुक्तांनी सांगितले.

पोलिसांचा कडक इशारा - कायदा हातात घेणाऱ्यांची गय नाही

अमितेश कुमार यांनी नागरिकांना विश्वास देत सांगितले की, कुणीही कायदा हातात घेऊ नये. पुणे पोलिसांकडून अशा गुन्हेगारी टोळ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल. नागरिकांनी निर्भय राहावे आणि पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

मुंबईत मनपाच्या १० वर्षांत १०० शाळा बंद

मराठी माध्यमांच्या शाळांना गळती

मुंबई (वार्ताहर): एका बाजूला मराठी भाषेचे संवर्धन होण्यासाठी सरकार आणि साहित्य वर्तुळात प्रयत्न होत आहेत. नुकतेच राज्य सरकारने सर्व शासकीय आणि निम-शासकीय कार्यालयात मराठी भाषा अनिवार्य केली. तसेच दिल्ली येथे होत असेलल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषेचा गजर करण्यात आला. मात्र दुसऱ्या बाजूला मराठी माध्यमांच्या शाळांची संख्या मात्र रोडावत चालली आहे. मुंबई महापालिकेने नुकतेच 'युनिफाइड डिस्ट्रिक्ट इनफॉर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन (यूडीआयएसई)' कडे शाळांची माहिती संकलित करून दिली.

या आकडेवारीतून मागच्या दशकभरातील मराठी माध्यमांच्या शाळांची दुर्दशा दिसून आली आहे. २०१४-१५ या शैक्षणिक वर्षांत मुंबई महानगरपालिका मराठी माध्यमाच्या ३६८ शाळा चालवत होती. आता २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात शाळांची संख्या २६२ वर आली. १० वर्षांत १०० शाळा बंद झाल्या आहेत. मराठी शाळांचा टक्का घसरत असल्यामुळे

शिक्षक वर्ग आणि मराठी भाषेसाठी आग्रही असणाऱ्या सामाजिक धुरीणांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. विशेषतः २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिन साजरा केला जाणार असताना अनेकांना मुंबईतून मराठी भाषेचा हास होत असल्याची भीती वाटते. काही शिक्षकांच्या मतानुसार, मराठी माध्यमाच्या शाळा टिकवून ठेवण्यासाठी महापालिकेने काही सक्रिय पावले उचलण्याची आवश्यकता आहे. मुंबई मनपा संचालित मराठी शाळेच्या मुख्याध्यापकांनी सांगितले, पालक इंग्रजी शाळांना प्राधान्य देत आहेत, म्हणून मराठी शाळा बंद करणे कितपत योग्य आहे? मराठी शाळा टिकवण्याची जबाबदारी सरकारने उचलली पाहिजे. सरकारच्या धोरणावर इतर शिक्षकही प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. अमराठी शाळांवर मराठी भाषा शिकविण्याची सक्ती करण्यापेक्षा सरकारने मराठी माध्यमाच्या शाळा आणखी कशा सुधारतील, याकडे लक्ष दिले पाहिजे.

पालकांचा कल बदलला

पालकांचा कल बदलला असल्यामुळे मराठी शाळांना उत्तरती कळा लागल्याचे मुंबई मनपाचे शिक्षण अधिकारी राजेश कंकाळ यांनी मराठी माध्यमाच्या शाळांना गळती पालकांचा कल बदलला म्हणाले की, अनेक पालकांना इंग्रजी माध्यमांच्या शाळा खुणावू लागल्या आहेत, ज्याना तिथे प्रवेश मिळत नाही, ते दुसरा पर्याय म्हणून शाळा निवडतात, तथापि मागच्या तीन वर्षांत मुंबई महानगरपालिकेच्या मराठी माध्यमाच्या शाळांमधील प्रवेश संख्येत वाढ झाल्याचे त्यांनी नमूद केले.

फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला राज्य सरकारने सरकारी आणि निमसरकारी कार्यालयात मराठी भाषेचा वापर अनिवार्य केला. गेल्या वर्षी केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यानंतर राज्य सरकारने व्यापक मराठी भाषा धोरणाला मान्यता दिली, त्याचाच हा भाग असल्याचे सांगितले जाते.

संक्षिप्त वृत्त...

शहराध्यक्षपदी विनोद धापसे यांची निवड

सेलू,/प्रतिनिधी : शहरातील सामाजीक कार्यकर्ते विनोद धापसे यांची आँल इंडिया पँथर सेनेच्या सेलू शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली.आँल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार व ट राज्य अध्यक्ष विनोद भोळे यांच्या आदेशान्वे जिल्हाध्यक्ष निवृत्ती वाघमारे व रोहन आकात यांच्या हस्ते विनोद धापसे यांना निवडीचे पत्र देण्यात आले आहे.धापसे यांच्या निवडीचे सर्वस्तरातून स्वागत करण्यात येत आहे.

राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी

गंगाखेड/प्रतिनिधी :- भगवती मंदिर, शिवाजी चौक, गंगाखेड येथे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन महापुरुष जयंती समितीचे संकल्पक माधवराव चव्हाण आणि नारायणराव घनवटे यांनी केले . कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी गाडगेबाबांच्या समाजसेवा, स्वच्छता व शिक्षणावरील कार्याची महती सांगत त्यांच्या विचारांचा जागर . यावेळी उपस्थित संत सेवालाल महाराज तांडा सुधार योजनेचे परभणी जिल्हा स्तरीय अशासकीय सदस्य दशरथ राठोड, उत्कृष्ट निवेदक अंबादास चव्हाण, क्रीडा शिक्षक बाळासाहेब राखे, नेमिचंद नखत, भय्यासाहेब भोसले, इस्तेयाक अन्सारी, उत्तम पवार, नांदे, सुरज तेलंग अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित .

सुमनताई गव्हाणे विद्यालयात स्नेहमिलन सोहळा संपन्न

परभणी,/प्रतिनिधी: सुमनताई गव्हाणे विद्यालयात इयत्ता १० वी २००४ च्या बॅच चा स्नेहमिलन सोहळा आयोजित करण्यात आला . या कार्यक्रमास सेवानिवृत्त मुख्याध्यापक जी.एस.मुंडे, मुख्याध्यापक के.यु.तांदळे, शिक्षक श्री.कुलकर्णी, श्री.चाटसे,श्रीमती लटपटे, श्रीमती शेप,श्रीमती घुले, श्री.केंद्रे, श्री.घुगे,श्री.कदम उपस्थित होते.

या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतःचे मनोगत व्यक्त केली. तसेच उपस्थित सेवानिवृत्त मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी १० वी २००४ बॅच मधील सुरेश पुरी, दीपक गिरी, गणेश मुळे, रवी भोसले, गजानन शिंदे, विलास खुपसे, अशोक बल्लाळ, दिगंबर बहिरट, सुधाकर शिंदे, सुरज चमकुरे, शिवाजी कोठेवाड, मनोज शहाणे, हेमंत कांबळे, मोहन पवार,गजानन धूत, सचिन कांबळे, संतोष इंगळे, आमोल आगळे, अशोक वावरे, विलास कदम, संदीप पंचांगे, संदीप देशमुख, कल्याणी शेंडगे, मनीषा भालेराव, किरण जगताप, अर्चना आगळे, संगीता भाले, स्वाती वाकळे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या. यावेळी २००४ बॅच च्या विद्यार्थ्यांकडून शाळेस भेट स्वरुपात आठ फॅन देण्यात आले.

मळणी यंत्रामध्ये पडून महिलेचा मृत्यू

परभणी,/प्रतिनिधी: परभणी तालुक्यातील दैठणा येथील एका ४५ वर्षीय महिलेचा मळणी यंत्रामध्ये पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी (दि.२०) घडली.

शोभा गोविंद कच्छवे (वय ४५ वर्षे) या गावातीलच एका शेतकऱ्याच्या इंदेवाडी शिवारातील शेतामध्ये हरभरा काढणीसाठी रोजंदारीने गेल्या होत्या. गुरुवारी (दि.२०) दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास हरभरा काढणी संपल्यामुळे ट्रॅक्टर बंद होत . त्यावेळी मळणी यंत्र बंद होत असतानाच कच्छवे यांचा तोल गेला व त्या मळणी यंत्रामध्ये पडल्या, त्यावेळी त्यांच्या डोक्यामध्ये मळणी यंत्रातील लोखंडी सळई घुसल्या त्यातच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती दैठणा पोलिसांना मिळताच घटनास्थळी सपोनी अशोक जायभाये, बळीराम मुंडे, अमोल कच्छवे यांनी भेट देऊन पंचनामा . तसेच मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी परभणी येथे पाठवण्यात आला. या घटनेची नोंद दैठणा पोलीस ठाण्यात करण्यात आली. कच्छवे यांच्या पश्चात पती, तीन मुली व एक मुलगा असा परिवार . या दुर्देवी घटनेमुळे दैठणा गावात हळहळ व्यक्त होत .

लाच स्विकारणारे दोघे ॲन्टी करप्शनच्या जाळयात

परभणी,/प्रतिनिधी: येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील मोटार परिवहन निरीक्षक संतोष नंदकुमार डुकरे व खाजगी व्यक्ती मुंजा नामदेवराव मोहिते या दोघांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या एका पथकाने पाचशे रुपयांची लाच स्विकारतांना ताब्यात घेतले. येथील एका रिक्षा चालकाने रिक्षा पासींकरीता फिटनेस सर्टिफिकेट रिन्यू करण्याकरीता मोटार वाहन निरीक्षक डुकरे यांच्याशी संपर्क साधला तेव्हा, तेथील खाजगी व्यक्ती मुंजा मोहिते यांनी पाचशे रुपयांच्या लाचेची मागणी केली. श्री. डुकरे यांनी संबंधित रिक्षा चालकास स्पष्टपणे इशारे करुन तसेच करावे असे निर्देश दिले. त्यामुळे संबंधित रिक्षा चालकाने तात्काळ लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडे धाव घेतली, तो प्रकार निदर्शनास आणून दिला. या खात्याने पथक नियुक्त करीत शुक्रवार २१ फेब्रुवारी रोजी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात सापळा रचला व मोटार वाहन निरीक्षक डुकरे यांच्यासह पंचासमक्ष पाचशे रुपयांची लाच स्विकारतांना खाजगी मुंजा मोहिते यास ताब्यात घेतले. , या प्रकरणात ताडकळस पोलिस ठाण्यात संतोष डुकरे व मुंजा मोहिते या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला . अहिल्या नगर येथील या खात्याच्या पोलिस निरीक्षक श्रीमती छाया देवरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली. त्यात अरुण शेख, सचिन सुद्रुक, गजानन गायकवाड यांचा समावेश ., या कारवाईने उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील भ्रष्ट लॉबीचे किस्से पुन्हा पुढे येवू लागले .

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

सेलूत प्रतिष्ठानकडून भव्य ऐतिहासिक शिवजन्मोत्सव मिरवणूक- सजीव देखावा आकर्षण

शिवाजी आकात

सेलू ,/प्रतिनिधी:- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त शहरातून शिवप्रतिष्ठानच्यावतिने भव्य मिरवणूक काढण्यात आली.बूधवार १९ रोजी शिवतिर्थावर अभिवादन करण्यासाठी शिवप्रेमींनी रांगा लावल्या होत्या तसेच शहरातून त्र शिवाजी महाराज यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणुकीत कोल्हापूर येथील शांतीदूत मर्दानी आखाडा यांची यूद्धकलेचे प्रात्यक्षिके, हलगी पथक, हलगी सम्राट पथक, स्थानिक हिंदू मूर्लींचे झांज-लेझीम-ध्वज पथक, बॅन्ड पथक व शिवछत्रपतींची मूर्ती, ग्रामदैवत बाबासाहेब महाराज यांची मूर्ती, विठ्ठल रखुमाई मूर्ती, महाकालेश्वर मूर्ती असे देखावे सादर करण्यात आले. त्र शिवाजी महाराज स्मारक शिवतीर्थ येथून हि मिरवणूक शहरातील मुख्य मार्गावर काढण्यात आली व शिवतीर्थ येथेच पोहोचली. सदरील मिरवणूक हि अत्यंत शिस्तबद्ध व पारंपारिक पद्धतीने संपन्न झाली, सेलू शहरातील शिवजन्मोत्सवाची हि ऐतिहासिक मिरवणूक ठरली. समारोप प्रसंगी शिवछत्रपतींच्या जिवन चरित्रावरील जिवंत देखावा दाखवण्यात आला. यामध्ये हजारो हिंदूमाता भगिनींच्या व शिवभक्तांच्या वतीनं शिवछत्रपतींच्या स्मारकाची सामूहिक आरती करण्यात आली. भव्य आतिषबाजीने या मिरवणूकीची सांगता करण्यात आली.तसेच हैदराबाद (भाग्यनगर) येथील आमदार राजा सिंह ठाकूर यांचे त्र शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ शिवप्रतिष्ठान या संघटनेच्यावतिने व्याख्यानाचे आयोजन केले होते आपल्या भाषणातून हिंदू बांधवांनी शिवाजी महाराज संभाजी महाराज यांचे विचार आत्मसात करून आपल्या सर्व हिंदू बांधवांनी संघटित हवे असे आवाहन केले.

शिवमैरथाँन स्पर्धेस प्रतिसाद सकाळी ६:१० मिनिटास शिवमैरथाँन स्पर्धेची सूरूवात करण्यात आली यामध्ये मोठ्या संख्येने मूले,मूली,महिला,जेष्ठ व यूवकांनी सहभाग नोंदविला जवळपास ६०० स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला.यामध्ये मूले व वरिष्ठांसाठी ३ किमी तर इतरांसाठी ५ किमी मध्ये स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती.

सेलूत लॉयन्स क्लबच्या नेत्र व दंत शिबीरात ३८० रुग्णांची तपासणी

सेलू,/प्रतिनिधी : येथील लॉयन्स क्लब च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र व दंतरोग तपासणी शिबीरात ३८० रुग्णांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ६९ रुग्णांची लॉयन्स नेत्रालय परतूर येथे अत्यल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार.

रविवार दिनांक २३ रोजी हुतात्मा स्मारक येथे आयोजित शिबीराचे उद्घाटन प्रसिद्ध उद्योजक रामप्रसाद घोडके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लॉयन्स क्लबचे रिजनल चेअर पर्सन लॉ. दिलीप मोदी, लॉ.संजय गुप्ता, लॉ.राजेश लुनिया, लॉ.मनोहर खालापुरे , डॉ.चव्हाण तालुकाध्यक्ष सुयश पटवारी सचिव डॉ बाळासाहेब जाधव , डॉ.शैलेश मालाणी, संजीवनी खालापुरे यांची उपस्थिती होती. नेत्र तपासणी साठी लॉयन्स नेत्रालयाचे तंत्रज्ञ अशोक पौळ, आकांक्षा केवारे, पुजा पाचारे , कवीता दुगाने तर दंत तपासणी साठी डॉ विजय सावंगीकर , डॉ कुंदन राऊत , डॉ सौ भाबट, डॉ परेश बिनायके रुग्वेद लॅबचे गणेश आकात , महेश गोरे , प्रमोद हिंगे यांनी रुग्णांची तपासणी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाळासाहेब जाधव ,सुत्रसंचालन सुभाष मोहकरे तर दतात्रय सोळंके यांनी आभार मानले. शिबीराच्या यशस्वीतेसाठी सहसचिव डॉ.अनुराग जोगदंड , डॉ. आशिष मेहता , डॉ. सुदर्शन मालाणी, अनुप गुप्ता, राजेंद्र सराफ, खुशाल तांगडे, कृष्णा काटे, विनोद शेरे , शंभू काकडे , जयसिंग शेळके,वैभव संघई, अजित सराफ , डॉ.उमेश गायकवाड , डॉ. कैलास आवटे, सागर लोया आदिंनी परिश्रम घेतले.

विराज हॉस्पिटलच्या शिबिराचा ५०० रुग्णांनी घेतला लाभ

बाबासाहेब गर्जे

सोनपेठ,/प्रतिनिधी- नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबवत आरोग्य सेवेचा वसा घेतलेल्या सोनपेठ येथील विराज मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये रविवार दि.२३ फेब्रुवारी रोजी आरोग्य शिबीर घेण्यात आले.यामध्ये ५०० रुग्णांची आरोग्य तपासणी करून मोफत गोळ्या औषधीचे वाटप करण्यात आले तर ५० रक्त दात्यांनी रक्तदान केले.

छत्रपती शिवाजी महाराज व क्रांतिकारी संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोनपेठ येथील विराज मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल तर्फे भव्य आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिराचे उद्घाटन आमदार राजेश विटेकर यांच्या हस्ते झाले तर याप्रसंगी व्यासपीठावर ग्रामीण रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विठ्ठल कराड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष पवार यांची उपस्थिती होती. या शिबिरात बालरोगतज्ज्ञ डॉ.भारत चव्हाण, डॉ.रोहीणी चव्हाण, डॉ.अंकुश मैंदाड, डॉ. प्रकाश पवार, डॉ.आकाश थोरवे, डॉ.दीपेश मुंडे, डॉ.पूजा पवार,डॉ.अमोल सातभाई यांनी सहभाग घेऊन रुग्णांची तपासणी केली.

या शिबिरात गरोदर माता व नवजात शिशू यांचे विविध आजार, डोळ्यांचे विकार,दातांचे आजार, मेंदूचे आजार,त्वचा रोग, मुळव्याध, ऱ्हदयरोग, लकवा, बिपी, सुगर इत्यादी आजारांच्या ५०० रुग्णांची तपासणी करून मोफत गोळ्या औषधींचे वाटप करण्यात आले. तसेच शिबिरामध्ये एकूण ३३ रुग्णांची मोफत रक्त तपासणी करण्यात आली.

ज्ञानसाधना कॉलेजमध्ये सप्ताह धुमधडाक्यात संपन्न

मोहन धारासूरकर

परभणी ,/प्रतिनिधी- ज्ञानसाधना प्रतिष्ठान परभणी अंतर्गत ज्ञानसाधना कॉलेज ऑफ फार्मसीच्या महाविद्यालयात दिनांक १७ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी २०२५ यादरम्यान या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम ज्ञानसाधना प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. किरण सोनटक्के सर व प्रमुख पाहुण्या संस्थेच्या सचिव सौ शितल सोनटक्के मॅडम यांच्या अमूल्य अशा मार्गदर्शनातून पार पाडण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी तथा फॅशन आयकॉन स्पर्धेसाठी लाभलेले निरीक्षक डॉ स्नेहल लाभशेटवार दंतरोग तज्ञ चिंतामणी क्लिनिक परभणी, श्री.वैभव अंबिलवादे सौंदर्या ब्युटी पार्लर परभणी, सौ मनिषा चव्हान न्यू लुक ब्युटी पार्लर परभणी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांच्या प्रतिमा पूजन व द्वीप प्रज्वलनाने झाली. उपस्थित सर्व मान्यवरांचा फार्मसी महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला. हा सप्ताह शारीरिक खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम अशा दोन टप्प्यात घेण्यात आला होता . यात क्रिकेट , टेबल टेनिस , चेस , कॅरम , संगीत खुर्ची, हॉलीबॉल , रस्सी खेच, खो खो यासारखे खेळ खेळण्यात आले तर सांस्कृतिक कार्यक्रमांमधून ट्रॅडिशनल डे , रॅम्प वॉक , क्विज कॉम्पिटिशन , बॉलीवूड डे , डायलॉग डान्स , म्युझिकल अंताक्षरी , मिस मॅच डे , सिंगिंग ड्रामा असे कार्यक्रम घेण्यात आले.कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाविद्यालयातील सर्वच विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभागाकडून ड्रेसिंग थीम देण्यात आली होती .त्यामुळे आज सर्वच विद्यार्थ्यांनी ट , राजस्थानी , पंजाबी , गुजराती , मद्रासी ड्रेसिंग मध्ये मुले आल्यामुळे संपूर्ण भारतीय संस्कृतीचे दर्शन आज पाहायला मिळाले .जरी आमच्या देशात वेगवेगळ्या जाती , धर्म , पंथ , भाषा भेद असले तरी आम्ही सर्वजण एकच आहोत असा संदेश आजच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी दिला . वरील स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या विद्यार्थ्यांचे व संघाचे सन्माननीय मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक , स्मृतिचिन्ह व ट्रॉफी या स्वरूपात बक्षीस वितरण करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम डी सलाउद्दीन यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका वाळके एस एस व प्राध्यापिका पवार एम ई यांनी केले.

सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीफार्मसी महाविद्यालयाचे समन्वयक श्री डी व्ही सूर्यवंशी, , प्राचार्य डॉ. सलाहुद्दीन एम डी , उपप्राचार्य क्षीरसागर एन व्ही, विभाग प्रमुख सौ नजन ए ए,विभाग प्रमुख श्री पी एन काळे , सांस्कृतिक प्रमुख सौ ज्योती पडोळे व पवार एम ई प्राध्यापक तथा प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच फार्मसी महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी यांनी विशेष मेहनत घेतली.

नदीची स्वच्छता ही निरोगी आयुष्यासाठी काळाची गरज आहे- डॉ.गारोळे

गंगाखेड,/प्रतिनिधी : गोदावरी स्वच्छता अभियान गंगाखेड यांच्या वतीने गेल्या पाच वर्षापासून सातत्याने गोदावरी नदीची स्वच्छता करण्यात येते तसेच सर्व महापुरुषांची जयंती देखील गोदातट येथे साजरी करण्यात येते, त्या अनुषंगाने आज गोदातट येथे श्री गजानन महाराज प्रकट दिन ,छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली.

त्याप्रसंगी बोलताना डॉ. गारोळे यांनी असे सांगितले की जल है तो कल है आणि ते जल स्वच्छ असणे हे निरोगी आयुष्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे नदीपात्रात कसल्याही प्रकारची घाण टाकू नये कारण आपण नदीला माता म्हणतो आणि त्या मातेलाच आपण घाण करतो त्यामुळे ते पाणी दूषित होत व मानवाचे आरोग्य धोक्यात येते,जस आपल्या शरीराला रक्तवाहिन्या आवश्यक असतात तसच नदीला सुद्धा निखळ, विनाअडथळ्याचे वाहू देणे गरजेचे आहे तरच ती जिवंत राहील असे ते म्हणाले, गारोळे यांनी देखील गोदावरी स्वच्छता अभियाना मार्फत वृक्षारोपण, पर्यावरण, प्लास्टिक बंदी ईत्यादी कार्याची दखल घेतली व वेळोवेळी लागेल ती मदत देण्यास आम्ही सदैव तयार राहू असे सांगितले, लटपटे यांनी आलेल्या सर्व मान्यवरांना एक एक वृक्ष देऊन सन्मान केला,शिवसेना नेते राखे यांनी सर्व स्वच्छता दूतांना मार्गदर्शन केले व हे अभियान दिवसेंदिवस लोकांपर्यंत कसे पोहोचेल यासाठी मी प्रयत्नशील राहील असे यावेळी सांगितले, या प्रसंगी प्रतिभाताई वाघमारे, सौ. प्रभाताई राजेंद्र, सौ.शिवमाला लांडगे, सौ.ज्ञानेश्वरी लटपटे, सौ. दिव्या बंग, औताडे मॅडम, उमाकांत साकोळकर,बाळु डमरे बापुराव जोशी, प्रविण कंधारकर व सर्व स्वच्छता दुत उपस्थित होते.

श्री क्षेत्र जैनगिरी (जटवाडा) येथे २७ रोजी पंचामृत अभिषेक व महाप्रसादाचे आयोजन

छत्रपती सभाजीनगर प्रतिनिधी – शहरापासुन १२ कि.मी.अंतरावरील असलेल्या हजारो जैन बांधवांचे श्रध्दास्थान श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक २७ फेब्रुवारी गुरुवारी २०२५ रोजी अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक श्री.संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात करण्यात येणार आहे. यावेळी सर्व उपस्थित समाज बांधवांना सकाळी ११ते २ या वेळेस संजीव मनीष मनोज अलोक श्रवन सिंघई परीवार छत्रपती सभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे. अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा आरती करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादी दाता परिवार व जटवाडा क्षेत्राचे विश्वस्थ मंडळ यांनी केले आहे. श्री.क्षेत्र जैनगिरी येथे महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येत असतो तसेच यावेळी महाप्रसादाचेही आयोजन केले जाते.

जलजीवन मिशन, पाणीटंचाईची आढावा बैठक कन्नड येथे संपन्न

तभा वृत्तसेवा

कन्नड : तालुक्याला पाणीटंचाईची चाहूल लागताच पंचायत समिती,तहसील व पाणीपुरवठा विभागाच्या वतीने आमदार संजना जाधव व उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्या अध्यक्षतेखाली पाणीटंचाई व जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठ्याच्या अपुर्ण कामा संदर्भात आढावा बैठक दि.२४ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वा. एका खाजगी मंगल कार्यालयात आयोजित करण्यात होती.

यावेळी चिकलठाण, बनशेंद्रा,रुईखेडा,शिवराई,सासेगाव, जैतापूर, आंबा तांडा देवगावरं,हस्ता,पळशी,नाचनवेल,सायगव्हाण येथील सरपंचांसह तालुक्यातील अनेक गावांच्या सरपंचांनी जल जीवन मिशन अंतर्गत चालू असलेल्या पाणीपुरवठा योजने संदर्भात तक्रारींचा पाढाच आमदार जाधव यांच्या समोर मांडला.

तालुक्यात गेल्या चार वर्षापासून जलजीवन मिशन अंतर्गत २१२ महसुली गावांपैकी १७६ गावांमध्ये पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु असुन या पैकी फक्त सहा गावांचे काम पूर्ण झाल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले असले तरी त्या ही गावातील सरपंचांनी या कामाबाबत पाणीटंचाई आढावा बैठकीत तक्रारी केल्या. तसेच १७६ कामांपैकी २६ गावांचे काम एकाच ठेकेदाराला दिल्याचेही यावेळी निदर्शनात आल्याने आमदार संजना जाधव यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले जिल्ह्याभरात जलजीवन मिशन योजनेचे काम करत असलेल्या नॅपकॉन कंपनीच्या अधिकाऱ्यांनी समाधान कारक उत्तर दिले नाही त्यामुळे दोन दिवसात पाणीपुरवठ्याच्या सुरू असलेल्या अपूर्ण कामांचा लेखी स्वरूपात अहवाल अमदारांनी मागितला.

यावेळी बैठकीस तहसीलदार विद्याचरण कडवकर , गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे, सहाय्यक गटविकास अधिकारी विजय पंडित, जल जीवन मिशनचे अतिरिक्त उपअभियंता सागर बेहेरे, वनपरिक्षेत्र अधिकारी आंनद गायके, वन्यजीव परिक्षेत्र अधिकारी सचिन रामपुरे, विस्तार अधिकारी संतोष दारकुंडे, ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे अध्यक्ष योगेश धाडबळे, तलाठी संघटनेचे अध्यक्ष रमेश चव्हाण,दिपक एरंडे,नितीन मगरे यांच्यासह सरपंच उपसरपंच मंडळ अधिकारी,ग्रामपंचायत अधिकारी, तलाठी पंचायत समिती कर्मचारी उपस्थित होते.

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ५५/२०२५

अर्जदारः १. मंगलाबाई रामचंद्र नगरे, वय ६५ वर्ष, धंदा-घरकाम, २. दिपक रामचंद्र नगरे, वय- ३६ वर्ष, धंदा मजुरी, ३. ईश्वर रामचंद्र नगरे, वय ४१ वर्ष, धंदा मजुरी, १ ते ३ रा. गोंदेगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर४. देवकाबाई नंदू तेली, वय- ४५ वर्ष, धंदा घरकाम रा. पिंपळगाव बु. ता. पाचोरा, जि. जळगाव. ५. स्वाती परमानंद माहोर, वय-३४ वर्ष, धंदा-घरकाम. रा. पांगरी, पो. अंभई, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर

।। : विरुध्द :- ।।

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत रामचंद्र निमीचंद नगरे हे दिनांक ०९/०३/२०२४ रोजी गोंदेगाव ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत रामचंद्र निमीचंद नगरे यांचे वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २८/०३/२०२५

आज दिनांक २४/२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

संघ हीच जीवनगाथा

अलकः- (५०) ध्वजप्रणाम

स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज तिरंगा आहे. ध्वजाच्या मध्ये असलेले चक्र सतत कार्यरत रहा; अशा अर्थाने २४ आरींचे बनलेले आहे. हा तिरंगा ध्वज भारत मातेचे हृदयच आहे. आपण सर्वजण या राष्ट्रध्वजाला सन्मानपूर्वक प्रणाम करतो.

रंग केशरी त्यागाचा हा।
शुभ्र धवल हा शांतीचा।
हिरवा रंग मैत्रीचा हा।
तिरंगी ध्वज या देशाचा ।।
।। भारत माता की जय ।।
वंदे मातरम ।।

भगवा ध्वज भारत मातेच्या हृदयाचे संरक्षण करणारा आहे. तो राष्ट्रगुरु आहे.

ज्याची गाथा आलोकित करते आपुला इतिहास । ज्याच्या उज्वलतेहून उज्वल फक्त उंच आकाश । जो शिकवि त्याग समर्पण बलिदान आम्हास । करू नमस्कार या स्फूर्तीदायी भगव्या ध्वजास ।। ।। राष्ट्रगुरु भगव्या ध्वजाचा विजय असो ।। ।। भारत माता की जय ।। ।। वंदे मातरम ।।

क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

कमलनयन बजाज रुग्णालयात एका दिवसात ४२ हून अधिक गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया

'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंद !

छत्रपती संभाजीनगर – कमलनयन बजाज रुग्णालयाने एका दिवसात ४२ हून अधिक गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करून प्रतिष्ठित 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये आपले नाव कोरले आहे या अभूतपूर्व यशाने रुग्णालयाच्या वैद्यकीय क्षेत्रातील उत्कृष्टता आणि प्रगल्भतेचे प्रतीक म्हणून महत्त्वाची उंची गाठली आहे. डॉ. शिवकुमार संतपुरे प्रख्यात सांधे प्रत्यारोपण व अस्थिविकार तज्ज यांच्या नेतृत्वाखाली या ऐतिहासिक शस्त्रक्रियांचा यशस्वी कार्यान्वयन झाला. या कामगिरीने रुग्णालयाच्या अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांसोबतच, समर्पित आणि निष्ठावान वैदयकीय तज्ञांच्या कार्यक्षमतेचे उत्तम उदाहरण मांडले आहे.

ही कामगिरी केवळ एक रेकॉर्ड नाही, तर हजारो रुग्णांसाठी वेदना मुक्त, सक्रिय आणि आनंदी जीवनाची एक नवी आशा आहे. रुग्णालयाच्या मार्गदर्शनाखाली, या रेकॉर्डने समाजाला एक नवा दृष्टिकोन दिला आहे, जो वेदना मुक्ततेच्या एका नवीन पर्वाकडे

वळवितो. या ऐतिहासिक यशामागे प्रख्यात सांधे प्रत्यारोपण व अस्थिविकार तज्ज्ञ डॉ. शिवकुमार संतपुरे, रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. जॉर्ज फर्नांडिस यांचे दूरदर्शी नेतृत्व तसेच ऑपरेशन थिएटरमधील टीम व नर्सिंग स्टाफ यांचा अतुलनीय परिश्रम आहे. एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या प्रमुख रेखा सिंग यांच्या हस्ते कमलनयन बजाज रुग्णालयाला प्रमाणपत्र आणि मानचिन्ह प्रदान करण्यात आला.

१३ तास ३० मिनिटे एवढ्या कालावधीमध्ये कमलनयन बजाज रुग्णालयाने ४२ अधिक गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार केली. वैद्यकीय क्षेत्रात हा नवा विक्रम असून याआधी नवी दिल्ली येथील डॉक्टर राजगोपाल यांच्या नावे नोंद होते त्यांनी एका दिवसामध्ये ३० शस्त्रक्रिया केल्या होत्या.यावेळी रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज फर्नांडिस, डॉ. शिवकुमार संतपुरे, डॉ. बालाजी असेगावकर, डॉ. मिलिंद वैष्णव, डॉ. सुधीर खडे ,डॉ. धैर्यशील गायकवाड, सीमा,एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या प्रमुख रेखा सिंग यांच्यासह रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.

बिडकीन येथे संत गाडगे महाराज यांची जयंती साजरी

बिडकीन दि २४ फेब्रुवारी पैठण तालुक्यातील बिडकीन येथे परीट, धोबी, समाजाच्या वतीने आज दि २३ फेब्रुवारी रोजी संत गाडगे महाराज यांच्या १४९ व्या जयंती निमित्त सोनार गल्ली येथून संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे रथामधून मिरवणूक काढण्यात आली. संत गाडगे बाबा प्रतिष्ठान निलजगाव फाटा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,सर्वप्रथम संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून पूजन करून महाआरती करण्यात आली व अभिवादन करण्यात आले, या कार्यक्रमा प्रसंगी अध्यक्षस्थानी सरपंच अशोक धर्मे , प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण, तसेच व्यासपीठावर किरण गुजर, राहुल ठाणगे, मधुकर सोकटकर, अंकुश धर्मे, रमेश शिंदे, अविनाश राठोड, विकास गोर्डे, ड सतीश हाडे, आदी मान्यवरांची उपस्थिती होती, यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण, सरपंच अशोक धर्मे, ड सतीश हाडे यांनी मार्गदर्शन केले, यावेळी स्वतंत्र सैनिक रंगनाथ आप्पा हिवाळे, लक्ष्मण गव्हाणे, मोहन हिवाळे, संतोष हाडे,अमोल कोथिंबीरे, जगन्नाथ चव्हाण, निलेश धडे, पत्रकार बांधव, तसेच परीट धोबी समाज बांधव विलास मुळे, संतोष शिंदे, बाबासाहेब राऊत, राम राऊत, निकेश राऊत, सुरेश राऊत, शाम राऊत, वरद शिंदे, डेबुजी भोसले, संजय भोसले, नितीन राऊत,सुरज भोसले, आनंद राऊत, सौरभ राऊत, शंकर राऊत, महिला, पुरुष ,बालगोपाल, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थिती होती.

शिवसेना भवन येथे संत श्री गाडगेबाबा जयंती साजरी

सोयगांव,दि.२ फेब्रुवारी : सोयगांव येथील माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांच्या जनसंपर्क कार्यालयात स्वच्छतेचे उपासक,राष्ट्रसंत श्री गाडगे बाबा महाराज जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना शहरप्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे,नं.प.गटनेते अक्षय काळे,नगरसेवक संदीप सुरडकर, राजू दुतोंडे,गजानन कुडके,जीवन पाटील,शेख बबलू, श्रावण राठोड,रमेश चव्हाण आदींची उपस्थिती होती.

पूर्णवादी नागरिक सहकारी बँक म., बीड

शाखा जालना रोड, औरंगाबाद

सोनेतारणाचा जाहिर लिलाव

जालना रोह संभाजीनगर

तमाम जनतेस कळविण्यात येते की, पूर्णपादी नागरिक सहकारी बँक म., बीड शाखा- जालना रोड, औरंगाबाद येथील खालील कर्जदारांनी सोने तारणावर घेतलेल्या कर्जाची थकबाकी रक्कम वेळोवेळी मागणी करुनही वा नोटीसा देवूनही भरणा न केल्यामुळे सदर खाती थकित / अनुत्पादित झाली आहेत. सदर सोनेतारण कर्जास तारण असलेल्या जिन्नसांचा जाहिर लिलाव वार मंगळवार दि. ११/०३/२०२५ रोजी दु. १.०० वाजता आयोजित करण्यात येत आहे.

अ.क्रं.	कर्जदाराचे नांव	पत्ता	येणे बाकी रक्कम दि. ३१/०१/२०२५ अखेर
०१	श्री यादव अरूण अप्पासाहेब गट	क्रं. १७६, प्लॉट नं. २५, स्वरूप हौसिंग सोसायटी, नर्मदेश्वर महादेव मंदिराजवळ, सिडको वाळुज महानगर-१, छत्रपती संभाजीनगर	रू. १,४३,०४९/-

वरील थकित कर्जदाराकडुन तारण ठेवलेल्या सोन्याच्या जिन्नसांचा लिलाव पूर्णवादी नागरिक सहकारी बँक म., बीड शाखा - जालना रोड, औरंगाबाद येथे आयोजीत करण्यात येत आहे. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाचे वेळी वाचुन दाखविण्यात येतील. त्याचप्रमाणे कोणतीही पुर्व सुचना न देता लिलावाची तारीख बदलण्याचा अथवा लिलाव रद्द करण्याचा हक्क बँकेकडे राखुन ठेवलेले आहेत.

स्थळ - जालना रोड, औरंगाबाद

दिनांक :- २४ फेब्रुवारी २०२५

शाखा व्यवस्थापक
पूर्णवादी नागरिक सहकारी बँक म.
शाखाः छत्रपती संभाजीनगर

PNSB/A'BAD/05/331/2024-25

जाहीर प्रगटन

विद्यमान श्रीमती व्ही. एन. काटकर मॅडम साहेब, दिवाणी न्यायाधीश' क' स्तर साहेब कन्नड, यांचे न्यायालयात

सी.एम.ए. ७८/२०२५ पुढील तारीख २०/०३/२०२५

अर्जदार :- १) गणेश लहू रावते, वयः ३५ वर्ष, धंदाः शेती, रा माटेगाव, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), २) तारा जगन्नाथ उगले, वयः ३६ वर्ष, धंदाः घरकाम, रा आंबेलोहळ, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) ३) पूजा बाळू सोनवणे, वयः ३२ वर्ष धंदाः घरकाम, रा देवळाना, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

विषय :- वारस हक्क प्रमाणपत्र (लीगल हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने त्याचे वकील श्री संदीप ए शिरसे यांचेमार्फत या न्यायालयात अर्जदार ही वरील ठिकाणचे रहिवासी असून अर्जदारांची मयत आई नामे कै. मंदाबाई लहू रावते असून त्यांचा मृत्यू दिनांक ०१/०१/२०२५ रोजी माटेगाव तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद येथे मयत झालेल्या आहे ग्रामपंचायत माटेगाव तालुका कन्नड येथील मृत्यू प्रमाणपत्र दाखल करत आहे. सदरील प्रकरणात अर्जदार क्रमांक १ हा मयत यांचा मुलगा असून, अर्जदार क्रमांक २ व ३ मयत यांच्या मुली आहे. सदरील अर्जदाराशिवाय मयत हिचे पती नामे कै. लहू नामदेव रावते असून त्यांचा मृत्यू दिनांक ०३/०६/२०२१ रोजी माटेगाव तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद येथे मयत झालेल्या आहे ग्रामपंचायत माटेगाव तालुका कन्नड येथील मृत्यू प्रमाणपत्र दाखल करत आहे. याव्यतिरिक्त मयत यांना इतर कोणीही वारस नाही तसेच रा देवगाव (रंगारी), तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद येथे शैक्षणिक अथवा सरकारी कार्यालय (तलाठी / ग्रामपंचायत, तहसील इत्यादी.) यासाठी अर्जदार यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केले आहे. सबब अर्ज दाखल करण्यास कारण घडले.

सबब या जाहीर प्रकटना द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कुणाचाही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा आपल्या विधिज्ञा मार्फत मा. न्यायालयात आक्षेप सादर करावा मुदतीत आक्षेप न आल्यास वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

दिनांक २१/०२/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर कन्नड

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ५७/२०२५

अर्जदार : १. शोभा शेषराव पवार, वय ३५ वर्ष, धंदा-मजुरी, रा. मुखेड, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर २. धूप शेषराव पवार, वय- १६ वर्ष, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे. अर्जदार क्र. २ साठी अ.पा.क. आई म्हणून अर्जदार क्र. १. ३. वैष्णवी शेषराव पवार, वय-१४ वर्ष, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे अर्जदार क्र. ३ साटी अ.पा.क. आई म्हणून अर्जदार क्र. १.....

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत शेषराव पुंडलिक पवार हे दिनांक १३/१२/२०२३ रोजी मुखेड, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत शेषराव पुंडलिक पवार यांचे वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २८/०३/२०२५

आज दिनांक २४/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ८३/२०२५

अर्जदारः- १. रंजना विनोद माने, वय ३९ वर्ष, धंदा-घरकाम, रा. किन्ही, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर २. यशराज विनोद माने, वय १६ वर्ष, धंदा- शिक्षण, रा. वरीलप्रमाणे. अर्जदार क्र. २ साठी अ.पा.क. आई म्हणून अर्जदार क्र. १, ३. पृथ्वीराज विनोद आाने, वय-११ वर्ष, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे अर्जदार क्र. ३ साठी अ.पा.क. आई म्हणून अर्जदार क्र. १.....

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत विनोद रामचंद्र माने हे दिनांक १५/१२/२०२५ रोजी किन्ही, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत विनोद रामचंद्र माने यांचे वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १७/०४/२०२५

आज दिनांक २४/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ५२/२०२५

अर्जदारः- १ भारताबाई शिवाजी जाधव, वय- ४० वर्ष, धंदा-मजुरी, रा. वाडी सुतांडा), ता. सोयगाव, जि. औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर २ तुषार शिवाजी जाधव, वय- १७ वर्ष, धंदा- मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ३ दिव्या शिवाजी जाधव, वय-१४ वर्ष, धंदा- नाही, रा. वरीलप्रमाणे अर्जदार क्र.२,३ साठी अ.पा.क. आई म्हणून अर्जदार क्र. १

।। -: विरुध्द :- //

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत शिवाजी रूपा जाधव हे दिनांक २०/०५/२०२१ रोजी वाडी सुतांडा),, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत शिवाजी रूपा जाधव यांचे वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २४/०३/२०२५

आज दिनांक २४/२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

जाहीर प्रगटन

मा. ए. आय आवटी दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.

दि.कि. अर्ज नं. ६५/२०२५ पुढील तारीख २७/०२/२०२५

अर्जदार : १. पुंजाबाई भ्र माधव पगारे. वयः ६१ वर्ष. धंदाः घरकाम. रा. औराळा. ता. कन्नड. जि. औरंगाबाद २. वनिता भ्र अशोक सातदिवे. वयः ४७ वर्ष. धंदाः घरकाम. रा. काजुपाडा कुर्ला वेस्ट मनोज मेडीकल समोर. मुंबई. साकीनाका मुंबई. ३. विजय माधव पगारे वय.४५ वर्ष. धंदा. रिक्षा ड्रायव्हर. रा. औराळा. ता. कन्नड, जि. औरंगाबाद ह.मु.पो मानपाडा. घोडबंदर रोड.ठाणे वेस्ट ४. वैशाली भ्र प्रविण साळवे. वयः ३६ धंदाः घरकाम. रा. ओल्ड भागीरथी चाळ. रुम नं १२१ एम.आय.डी.सी पाईप लाईन. महामार्ग पोलिस स्टेशन. सायबा नगर. कळवा वेस्ट ठाणे. ५. वैजंता भ बाळु खरात वयः ३२ वर्ष, धंदाः घरकाम. रा. रुम नं २०९. समता नगर घोड बंदर रोड रश्मी किराणा स्टोअर्स जवळ मु.पो पाथलीपाडा. ठाणे वेस्ट

विरुध्द

गैरअर्जदारः महाराष्ट्र शासन. व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत माधव राणु पगारे यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड.डी.एफ. म्हस्के यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार क्र. १ ते ५ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील नामे माधव राणु पगारे यांना अर्जदार क्र. १ ते ५ व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत. अर्जदारा क्र. १ ही मयत माधव राणु पगारे यांची पत्नी असुन अर्जदार क्र.३ हा मुलगा व अर्जदार क्र. २,४,५ ही मयताच्या मुली आहेत. अर्जदार क्र. १ यांचे पती तसेच अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील हे दि. १२/०४/२००९ रोजी मयत झालेले आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा औराळा येथे करण्यात आलेला आहे. मयत माधव राणु पगारे यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या बाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी

दिः ३०/०१/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क.स्तर कन्नड

जाहीर प्रगटन

मा. ए.आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.

दि.कि. अर्ज क्र. ११६/२०२५ पुढील तारीख २५/०३/२०२५

अर्जदार : १- काशिनाथ शंकर घुगे, वय ४१ वर्षे. धंदा- शेती, रा. देवपुळ, ता. कन्नड, जि. औरंगाबाद २- भानुदास शंकर घुगे, वय ३९ वर्षे, धंदा- शेती, रा. देवपुळ, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३- संगीता नागोराव ताठे, वय- ४५ वर्षे. धंदा घरकाम, रा. पिसादेवी रोड, औरंगाबाद ४- वंदना भ्र. नंदु वाघ, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. पनवेल वेस्ट, जि. रायगड ५- शंकर बाळा घुगे, वय-७८ वर्षे, धंदा- शेती, रा. देवपुळ, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु.ए. वारे यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार क्र. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ-बहीन असून. अर्जदार क्र. ५ हे त्यांचे वडील आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या आई व अर्जदार क्र. ५ यांच्या पत्नी नामे नर्मदाबाई शंकर घुगे या होत्या त्या दिनांक ०७/०१/२०१७ र

अग्रलेख...

साहित्य संमेलनातील मोदींची उपस्थिती

देशाच्या राजधानीत, नवी दिल्लीत ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नुकतेच पार पडले. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार हे होते आणि उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. मराठी साहित्य संमेलन असल्याने मोदींनी मराठीत सुरुवात केली आणि उपस्थितांची मने जिंकून घेतली. भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नाही, तर संस्कृतीचेही संवाहक आहे, असे जे प्रतिपादन मोदी यांनी केले, त्याला विशेष महत्त्व आहे. मोदी प्रसंगानुरूप बोलतात, समयसूचकता हा त्यांच्यातील श्रेष्ठ गुण आहे. ज्यादिवशी त्यांनी मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन केले, त्यादिवशी जागतिक मातृभाषा दिन होता. अशा दिवशी संमेलनाची सुरुवात केल्याबद्दल पंतप्रधानांनी आयोजकांचे अभिनंदन करताना धन्यवादही दिलेत. केव्हा, कुठे काय बोलायचे हे मोदींकडून शिकण्यासारखे आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार आहेत म्हणून मोदी उपस्थित राहणार नाहीत, असा मोदी विरोधकांचा, स्वयंघोषित पुरोगाम्यांचा, डाव्यांचा कयास होता. परंतु, मोदी उपस्थित राहिले आणि अशा सगळ्या लोकांचा भ्रमनिरास झाला. ज्या शरद पवारांमुळे मोदी उपस्थित राहणार नाहीत असे बोलले जात होते, ते तर मोदींनी खोटे ठरवलेच, पवारांना खुर्चीत बसण्यासाठी आधार दिला आणि त्यांच्या पुढ्यात असलेल्या काचेच्या प्याल्यात पाणी ओतून तो प्यालाही मोदींनी पवारांच्या हाती दिला. मोदींच्या या कृतीचे सर्वत्र स्वागत झाले असले तरी मोदी विरोधकांना मात्र धक्का बसला. अतिशय अनपेक्षित घडले होते. मोदी असे काही करतील याची अपेक्षा नसलेली द्वेष्टी मंडळी अचानक धास्तावली. या कृतीमुळे मोदींची लोकप्रियता वाढेल आणि आपली धोक्यात येईल, या कल्पनेने सगळ्या ढोंग्यांची मनं धास्तावली नसती तरच नवल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या भाषणात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीचा उल्लेख करीत, संघामुळे मराठी भाषेशी ओळख झाल्याचे सांगितले आणि त्याठिकाणी उपस्थित असलेल्या तमाम काकाप्रेमींच्या पोटात कालवाकालव झाल्याचे पाहायला मिळाले. स्वागताध्यक्ष असलेल्या काकांना, त्यांच्या समर्थकांना, ब्रिगेडींना संघाचे नावही घेतलेले चालत नाही. ही सगळी मंडळी संघाचा द्वेष करतात. संघात असलेली शिस्त त्यांना भावते, पण, संघाची वाढ झालेली पाहावत नाही, हे वास्तव आहे. मोदी काकांच्या बाजूलाच बसले होते. दोघांमध्ये संवाद झाल्याचेही देशाने पाहिले. विचारधारा वेगळी असल्याने अशा व्यक्तीच्या शेजारी बसू नये, हे संघाचे संस्कार नाहीत. आपल्या विचारधारेला घट्ट चिकटून राहताना अन्य विचारधारेचा सन्मान करणे फक्त आणि फक्त स्वयंसेवकांकडूनच शिकले पाहिजे, हे मोदींच्या संमेलनातील उपस्थितीने सिद्ध केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक आहेत, प्रचारक होते, हे संपूर्ण देशाला माहिती आहे. अशी माहिती असताना त्यांना संमेलनाचे उद्घाटक म्हणून बोलावण्यात आले, ते आलेही. मराठी साहित्य संमेलनात उपस्थित सगळेच संघ-भाजपाच्या विचारधारेचे नाहीत हे मोदींनाही माहिती होते. म्हणून त्यांनी संघाचा उल्लेख करणे टाळले नाही. संघाचे हे शताब्दी वर्ष आहे आणि मोदींनी हे औचित्य साधून केलेला उल्लेख योग्य ठरतो. यामुळे कुणाला आक्षेप असण्याचे कारण नाही. मोदींनी संघाचे नाव घेतले याचे आश्चर्य वाटण्याचेही कारण नाही. पण, मोदींनी यापूर्वी त्यांच्या कुठल्याही भाषणात संघाचा उल्लेख कधी केला होता, असा प्रश्न उपस्थित करून भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकसभेच्या निवडणूक प्रचार काळात भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी केलेल्या वक्तव्याचा विपर्यास करत विरोधकांनी भाजपा आणि संघ यांच्यात दरी निर्माण करण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण, तो फसला. हरयाणा, महाराष्ट्र आणि दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला जे दणदणीत यश मिळाले त्याचे श्रेय संघाला दिले जात आहे. हे खरे असले तरी संघाचे स्वयंसेवक हे फक्त निवडणुकीच्याच काळात काम करतात असे नाही. ते वर्षभर विविध क्षेत्रांत काम करीत असतात. सांस्कृतिक राष्ट्रवाद रुजविणे, हिंदूंना संघटित करणे, त्यांच्या कल्याणार्थ विविध उपक्रम राबविणे हे संघाचे काम आहे. शिवाय, स्वयंसेवकांनी कुठल्या क्षेत्रात काम करावे, कोणत्या राजकीय पक्षासाठी प्रचार करावा, हे संघाकडून स्वयंसेवकांना कधीच सांगितले जात नाही. त्यासाठी स्वयंसेवकांवर कुठलेही बंधन वा नियंत्रणही लादले जात नाही. मात्र, संघाची जी बैठक आहे, जी विचारधारा आहे, त्याच्याशीच मिळतीजुळती विचारधारा भाजपाची असल्याने आपोआपच स्वयंसेवकांची पावले भाजपाच्या दिशेने वळतात. त्यामुळे संघाने काम केल्याने भाजपाला तीन राज्यांत यश मिळाले हे खरे असले तरी स्वयंसेवकांनी नित्यनियमच पार पाडला, हेही लक्षात घेतले पाहिजे. संघाचे काम कसे चालते याची ओळख नसलेले लोकच अनावश्यक बोलतात, अपप्रचार करतात, हे वास्तव आहे. शिवाय, संघ स्वयंसेवक सक्रिय झालेत तर आपल्याला मोठे नुकसान सहन करावे लागेल अशी भीती ज्यांना सतावते तेही दिशाभूल करणारा 'नॅरेटिव्ह' सेट करतात आणि जनतेला मूर्ख बनविण्याचा प्रयत्न करतात. पण, गेल्या अनेक निवडणुकांचे निकाल लक्षात घेतले तर जनता हुशार झाल्याचे आपल्या लक्षात येईल.

आपले नेमके हित कशात आहे, कोण देशाला प्रगतीच्या मार्गावर घेऊन जाऊ शकतो, हे ओळखण्याची क्षमता नागरिकांमध्ये विकसित झाली आहे. मतदार प्रगल्भ झाला आहे. आमिषाला बळी न पडता स्वहित आणि देशहित लक्षात घेत मतदार मतदान करताना दिसत आहेत, ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने आनंदाची मानली पाहिजे. संघ आणि सावरकरांचे हिंदुत्व वेगळे आहे असा एक अपप्रचारही विरोधकांकडून वारंवार केला जातो. भाजपा आणि संघाला सावरकर चालत नाहीत, असा भ्रम निर्माण करण्याचाही प्रयत्न केला जातो. पण, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या भाषणात इतिहासातील संमेलन अध्यक्षांची नावे घेताना दोन वेळा स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव घेतले. त्यावेळी काकांची चुळबूळ लक्षात येण्यासारखी होती. सावरकर आणि संघ यांच्यात अंतर निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनाही ही मोठी चपराक होती. महाराष्ट्रातील अनेक साहित्यिक, अनेक संत यांची नावे घेत मोदींनी उपस्थितांची मने जिंकून घेतली. मोदींचे संमेलनातील भाषण ओजस्वी होते, अभ्यासपूर्ण होते, चिंतन करायला लावणारे होते. संघामुळेच आपला मराठीशी संबंध आला हे सांगताना मोदींना अजिबात संकोच वाटला नाही. उलट, त्यांच्या चेहऱ्यावर अभिमानाची आणि आनंदाची भावना स्पष्ट दिसत होती. विरोधकांच्या चेहऱ्यावरील आनंद यामुळे हरवलेला दिसला असला तरी मोदींना चाहणाऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद मात्र अनुभवण्याजोगा होता. मोदी आणि संघ हे वेगळे नाहीतच मुळात! स्वयंसेवक असल्याचा मोदींना अभिमान आहे. वसुधैव कुटंबकम हे संघाचे उद्दिष्ट आहे आणि ते गाठण्यासाठी मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार दिवसरात्र परिश्रम घेत आहे. मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाला देशाचे पंतप्रधान उपस्थित राहिले, नुसतेच उपस्थित राहिले नाहीत तर मराठी भाषेची श्रीमंती त्यांनी कथन केल्याने या संमेलनाची शान वाढली, प्रतिष्ठा वाढली, हे निश्चित! यावेळी बोलताना मराठी भाषेची अनेक वैशिष्ट्ये सांगायलाही मोदी विसरले नाहीत. मराठीत शूरताही आहे आणि वीरताही आहे, मराठीत सौंदर्यही आहे आणि संवेदनाही आहे, संवेदनाही आहे आणि समरसताही आहे, यात अध्यात्माचा स्वरही आहे आणि आधुनिकताही आहे, शिवाय मराठी ही संपूर्ण भाषा आहे आणि ती अमृताहुनी गोड आहे, असे सांगत पंतप्रधानांनी मराठी भाषेचे केलेले गुणवर्णन तमाम मराठी भाषिकांच्या कायम लक्षात राहील, यात शंका नाही. एक अमराठी व्यक्ती मराठी भाषेचे इतके सुंदर वर्णन-विवेचन करू शकते, हे पाहून मराठी भाषिकांना आनंद होणे स्वाभाविक आहे. मराठीवरील पंतप्रधानांचे प्रेम लक्षात घेता तमाम मराठी भाषिकांकडून त्यांचे अभिनंदन करणे आणि त्यांना धन्यवाद देणे क्रमप्राप्त ठरते. ■

दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

ट्रम्पकडून भारतही अपमानित!

२४ फेब्रुवारी २०२२! तीन वर्षांपूर्वी रशियाने आपल्या फौजा युक्रेनमध्ये घुसविल्या आणि आता अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प युक्रेनने हे युद्ध सुरू केल्याचे जगाला सांगत आहेत.

तीन वर्षापूर्वी अमेरिका युक्रेनच्या मदतीला धावली होती आणि आज तीच अमेरिका रशियाच्या मदतीसाठी सज्ज असल्याचे दिसत आहे.

जगाचा सत्तासमतोल : २० जानेवारी रोजी डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे ४७ वे राष्ट्रपती म्हणून शपथ घेतल्यापासून त्यांनी केलेली विधाने पाहता त्यांचा मानसिक तोल ढळला असल्याचे मानले जात आहे. मात्र याने जगाचा सत्तासमतोल ढळण्याची दाट शक्यता तयार होत आहे. आजवर सोवियत युनियन म्हणजे आताचा रशिया व त्याचे मित्र देश एकीकडे तर दुसरीकडे अमेरिका व युरोप असे साधारण चित्र होते. यात आता झपाट्याने बदल होत असून रशिया, चीन, चीनचे मित्र देश व मुस्लिम जगत एकत्र येत असताना दिसत असताना, अमेरिका मात्र युरोपातील आपल्या देशांना झिडकारीत असल्याचे दिसत आहे.

नवे समीकरण : वास्तविक अमेरिका, भारत व युरोप असे नवे समीकरण तयार व्हावयास हवे होते. साम्यवादी रशिया- चीन, त्यांना मुस्लिम देशांची मिळत असलेली साथ हे पाहता अमेरिका- भारत- युरोप हे एक शक्तिशाली समीकरण तयार झाले असते. पण, ट्रम्प यांनी केवळ भारताला दूर लोटले असे नाही तर त्यांनी युरोप व नाटोलाही मोडीत काढले असल्याचे दिसते.

भारताला लक्ष्य! : सत्तेवर आल्यापासून ट्रम्प यांनी भारताला लक्ष्य बनविण्याचे धोरण सुरू केले आहे. राजकीय शिष्टाचार मोडीत काढून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत त्यांनी केलेली विधाने पाहता ट्रम्प यांच्या मनात खरोखरीच भारताबद्दल प्रेम वा आदर आहे काय असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे.

दोन आव्हाने : राष्ट्रपती ट्रम्प यांच्यासमोर दोन आव्हाने होती- युक्रेन आणि गाझा पट्टी! या दोन्ही आघाड्यांवर मावळते राष्ट्रपती बायडेन यांनी एक तर्कसंगत भूमिका घेतली होती. एकीकडे त्यांनी रशियाला रोखण्यासाठी युक्रेनला पाठिंबा दिला, त्याला आर्थिक मदत, सैन्यसामुग्रीची मदत केली व नाटोला बळकट केले तर दुसरीकडे गाझा पट्टीत इस्रायल व हमास यांच्यात युद्धबंदी घडवून आणण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. ट्रम्प यांचे धोरण याच्या नेमके उलट आहे. एकीकडे ते हमासला धमक्या देत आहेत. याने गाझा पट्टीतील शांतता धोक्यात येत आहे तर दुसरीकडे ते रशियाचे राष्ट्रपती पुतिन यांच्याशी गोपनीय चर्चा करीत आहेत. नाटो देश व युक्रेन यांना अंधारात ठेवून त्यांनी हे चालविले आहे. याची तीव्र प्रतिक्रिया युरोप व युक्रेनमध्ये उमटणार होती आणि ती उमटली.

म्युनिक परिषद : जर्मनीच्या म्युनिक शहरात मागील आठवड्यात युरोपातील देशांची एक बैठक झाली. या बैठकीत युक्रेनचे राष्ट्रपती झेलेंस्की यांनाही निमंत्रित करण्यात आले होते. झेलेंस्की यांनी कोणताही आडपडदा न ठेवता ट्रम्प यांच्याबाबत आपली नाराजी व्यक्त केली. राष्ट्रपती ट्रम्प यांनी पुतिन यांच्याशी चर्चा करण्यापूर्वी माझ्याशी चर्चा करावयास हवी होती असे परखड विधान त्यांनी केले आणि उपस्थित नेत्यांनी टाळ्यांच्या कडकडाट करीत त्यांचे समर्थन केले. राष्ट्रपती ट्रम्प व राष्ट्रपती पुतिन यांनी युक्रेनबाबत एखादा निर्णय घेतल्यास तो त्या दोघांचा निर्णय असेल. तो स्वीकारण्यास युक्रेन बाध्य राहणार नाही हे त्यांनी स्पष्ट सांगून टाकले.

युरोपचे लष्कर : युरोपातील देशांनी एकत्र येत काही वर्षांपूर्वी 'युरो' हे चलन सुरू केले. ते आता स्थापित झाले आहे. त्याच धर्तीवर युरोपातील देशांनी स्वत:च्या रक्षणासाठी युरोपचे लष्कर तयार करण्याचा विचार केला पाहिजे असे प्रतिपादन झेलेंस्की यांनी केले तेव्हाही प्रतिनिधींनी त्यांच्या भूमिकेचे स्वागत केले. माजी राष्ट्रपती बायडेन असोत की आणखी दुसरा कोणताही राष्ट्रपती त्यांनी युरोपातील देशांना आपला मित्र मानले आहे. भारताबाबतही त्यांनी समंजस भूमिका घेतली आहे. पण ट्रम्प तसे काहीच करण्यास तयार नाहीत असे त्यांच्या विधानांवरून दिसते. युक्रेनचा प्रश्न केवळ या एका देशापुरता मर्यादित नाही तर युरोपच्या सुरक्षेबाबत आहे. रशियाने तीन वर्षांपूर्वी युक्रेनवर हल्ला केला. नंतर तो पोलंड ताब्यात घेण्याचा प्रयत्न करील. या भीतीने युरोपातील देशांना ग्रासले आहे. मात्र त्यावर विचार करून युरोपातील देशांना आश्वस्त करण्याऐवजी ट्रम्प यांना नाटोला जणू मोडीत काढले आहे. नाटोचे नाव घेण्यास ते तयार नाहीत असे दिसते. राष्ट्रपती पुतिन माझे मित्र आहेत असे म्हणत ते युक्रेन युद्धावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी जो तोडगा काढील तो रशिया व युक्रेन दोन्ही देशांनी मान्य करावा अन्यथा मी रशियावर कठोर निर्बंध लावेन अशी धमकी त्यांनी दिली आहे.

सौदी अरेबियाची मध्यस्थी : युक्रेन-रशिया युद्धात सौदी अरेबिया मध्यस्थी करीत असून या देशात ट्रम्प- पुतिन यांची भेट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दोन्ही देशांनी याबाबत आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सौदी अरेबियात प्राथमिक चर्चा करण्यास सांगितले आहे. २०१८ मध्ये याच सौदी अरेबियाच्या शासकास मोहम्मद बिन सलमानला ट्रम्प यांनी जमाल खशोगी या पत्रकाराच्या हत्या प्रकरणात दम भरला होता. आता त्याच सलमानला ते मिठी मारणार आहेत. सौदी अरेबियातील या प्रस्तावित चर्चेने राष्ट्रपती झेलेंस्की बिथरले आहेत. त्यांची भूमिका रास्त आहे. या दोन नेत्यांमध्ये कोणताही समझोता झाला तरी तो स्वीकारण्यास आपण बांधील नाही हे त्यांनी म्युनिक परिषदेत स्पष्ट शब्दात सांगितले. ट्रम्प यांच्या भूमिकेने अमेरिका व युरोप यांच्यात दरी निर्माण केली आहे.

युरोपला डावलले : राष्ट्रपती ट्रम्प यांनी युक्रेन प्रकरणात युरोपला पूर्णपणे डावलले असल्याचे दिसते. वास्तविक युक्रेन हे युरोपचे प्रवेशद्वार मानले जाते. आज युक्रेन, उद्या पोलंड, नंतर हंगेरी या क्रमाने रशिया युरोपात घुसण्याची योजना आखत आहे. पण, तरीही युरोपला आपल्यासोबत घेण्याची गरज ट्रम्प यांना वाटली नाही.

भारताबद्दल आकस : जगातील अनेक देशांचे नागरिक अमेरिकेत अवैधपणे राहात आहेत. पण, राष्ट्रपती ट्रम्प यांनी मेक्सिको व भारत यांना लक्ष्य बनविल्याचे दिसते. पाकिस्तानातून आलेल्या अवैध नागरिकांना परत त्या देशात पाठविण्यासाठी लष्करी विमानांचा वापर केल्याचे ऐकिवात नाही. भारतीय नागरिकांना परत पाठविण्यासाठी मात्र त्यांनी लष्करी विमानांचा वापर सुरू केला असून, या नागरिकांच्या हाता-पायात बेड्या घालून त्यांना परत पाठविले जात आहे. ट्रम्प यांची ही भूमिका निश्चितच 'मैत्री' या शब्दात मोडणारी नाही.

हास्यास्पद दृश्ये! : केवळ एका महिन्यात राष्टपती ट्रम्प यांनी स्वत:चे हसू करून घेणारे निर्णय घेतले आहेत. याचा परिणाम म्हणजे युवा वर्गात त्यांना मिळालेला पाठिंबा झपाट्याने कमी होत आहे. केवळ एका महिन्यात त्यांना या स्थितीचा सामना करावा लागत आहे. व्हाईट हाऊसच्या ज्या ओव्हल कार्यालयात महत्त्वाचे- ऐतिहासिक निर्णय घेतले गेले, तेथे आज दिसणारे दृश्य काय आहे? उद्योगपती एलन मस्क आपल्या १३ मुलांपैकी एका मुलास खाद्यांवर खेळवत सरकारी खर्चात बचत कशी करावी यावर भाषण देत आहेत आणि राष्ट्रपती ट्रम्प आपल्या खुर्चीत बसून ते ऐकत आहेत. यादरम्यान मस्क यांचा लहान मुलगा ट्रम्प यांच्याजवळ जाऊन कुजबुजतो, 'आपण गप्प राहा'! हा सारा तमाशा अमेरिकेतील वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध होत आहे.

एका महिन्यात घसरण : अमेरिकन मुत्सद्दी- पत्रकार, जगातील नेते डोनाल्ड ट्रम्प यांच्या या भूमिकेकडे अवाक होऊन पाहत आहेत. ट्रम्प व त्यांचे सल्लागार एलन मस्क आणखी कोणकोणत्या गमती जगाला दाखविणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पण, श्वास रोखून! ■

वेध

पुंडलिक आंबटकर

शेतकरी आत्महत्या एक सामाजिक समस्या

२१ फेब्रुवारी २०२५ रोजी वर्धा तालुक्यातील नागापूर येथील शरद राऊत नावाच्या अल्पभूधारक तरुणाने नापिकी आणि कर्जाला कंटाळून आत्महत्या केली. त्याने या जगातून स्वत:ची सुटका करवून घेतली. परंतु, आता त्याच्या मुली, आईवडील आणि पत्नीचे काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकरी आत्महत्या का करतात, हा प्रश्न ३ दशकांपासून महाराष्ट्रात आणि प्रामुख्याने विदर्भात वादळासारखा घोंगावत आहे. सरकारने शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी अनेक योजना आणल्या. परंतु, तरीही शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होऊ शकलेल्या नाहीत. त्यामुळे या समस्येचे मूळ शोधण्याचे आव्हान सरकारसह समाजापुढेही निर्माण झाले आहे.

पश्चिम विदर्भातील यवतमाळ, वर्धा, अमरावती आणि वाशीम जिल्ह्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झाल्या आहे. या जिल्ह्यांत कापूस व सोयाबीन ही दोन प्रमुख पिके घेतली जातात. या भागात कोरडवाहू क्षेत्र अधिक आहे. त्यामुळे थोडीफार शेती सोडली तर बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. या भागातही कालव्यांच्या माध्यमातून धरणाचे पाणी पोहोचले आहे. परंतु, धरणाच्या पाण्यासोबत मोठ्या प्रमाणात क्षार वाहून येत असल्याने शेतीची उत्पादकता घटली आहे. गोधन नष्ट होऊ लागल्याने उत्पादकता राखणे कठीण झाले आहे. पूर्वी जिथे एकरी १० क्विंटल सोयाबीन व्हायचे तिथे आता तीन किंवा चारच क्विंटल उत्पादन होते! या तुलनेत लागवड खर्च अधिक येतो आणि मग अल्पभूधारक आपोआपच कर्जाच्या खाईत ढकलला जातो. कित्येक शेतकरी कर्ज काढून मुलांना शिकवितात. आपली मुलं स्पर्धेत मागे पडू नये म्हणून अल्पभूधारक प्रसंगी कर्ज काढून मुलांना महागड्या शाळेत घालतात. अशा परिस्थितीत नापिकी झाली तर कर्जाचा डोंगर वाढत जातो आणि मग शेतकरी जीवन संपवण्याच्या मार्गावर येऊन ठेपतो.

केंद्र सरकारने १ फेब्रुवारी २०२५ रोजी सादर केलेल्या अर्थसंकल्पात शेतीसाठी विशेष तरतूद केली आहे. शेती आणि शेतकऱ्यांसाठी या अर्थसंकल्पात जवळपास ९ कार्यक्रम घोषित करण्यात आले आहे. गरजू शेतकऱ्यांना दरवर्षी पीएम किसान योजनेंतर्गत ६ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. शिवाय महाराष्ट्र शासनाने नमो शेतकरी महासन्मान योजना सुरू करून ६ हजार रुपयांची मदत सुरू केली. या दोन्ही योजनांमधून शेतकऱ्यांच्या खात्यात दरवर्षी एकूण १२ हजार रुपये जमा केले जातात. सरकारने अवघ्या १ रुपयात पीकविमा योजना आणली. परंतु, आजही अनेक शेतकरी या योजनेत सहभागी होत नाही, हे दुर्दैवच म्हणावे लागेल. ज्या कंपनीकडे या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी आहे, त्या कंपनीचे अधिकारी-कर्मचारी खरोखरच प्रामाणिकपणे आपले काम करतात का, याबाबत शासन आणि प्रशासनाने दक्ष असले पाहिजे. महाराष्ट्रात सरकारने ९० टक्के अनुदानावर सौरकृषिपंप ही क्रांतिकारी योजना आणली आहे. परंतु, कुठल्याही योजनेचे सकारात्मक परिणाम दिसायला वेळ लागतो. सरकार आपल्या परीने प्रयत्नरत आहे. परंतु, शेतकरी आत्महत्या ही एक सामाजिक समस्या आहे. १०० टक्के रासायनिक शेतीच्या मानसिकतेतून शेतकऱ्यांनी बाहेर पडले पाहिजे. राज्यात सर्वाधिक आत्महत्या झालेले पहिले चार जिल्हे अमरावती विभागातील आहे. २००१ पासून शेतकरी आत्महत्यांची नोंद घेतली जात आहे. शेती हा देशाचा प्रमुख व्यवसाय आहे आणि हा व्यवसाय दोन तृतीयांश नागरिकांच्या उपजीविकेचे मुख्य साधन आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या केवळ महाराष्ट्रातच नाही, तर पंजाब, उत्तरप्रदेश, केरळ आणि कर्नाटकातही होत आहेत. परंतु, या समस्येची धार पश्चिम विदर्भात सर्वाधिक आहे. विदर्भात मोठ्या संख्येने शेतकरी दरवर्षी कापूस लागवड करतात. यातील बहुतांश शेतकरी कमी-अधिक प्रमाणात सोयाबीनची लागवडसुद्धा करतात आणि हीच पिके प्रामुख्याने विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरलेली आहेत. काळ बदलला त्यानुसार आर्थिक आणि सामाजिक स्थितीसुद्धा बदलली. पूर्वीच्या तुलनेत शेतकऱ्यांचे जीवनमानही उंचावले आहे. ३५ वर्षांपूर्वी लोकांना खायला धड अन्नसुद्धा मिळत नव्हते. परंतु, तरीही तेव्हा शेतकरी आत्महत्या करीत नव्हते. आज पैसा वाढूनही शेतकरी आत्महत्या का करतात, या प्रश्नाचे उत्तर बदलती जीवनशैली आणि बदलत्या सामाजिक स्थितीत दडलेले आहे. शेतकऱ्यांनी आता पीक पद्धतीत बदल केला पाहिजे. शेतीत रसायनांचा वापर एकाएकी टाळला तर उत्पादन घटते. त्यामुळे शेतकरी रासायनिक शेतीत बदल करायला तयार नाहीत. मात्र, हळूहळू रसायनांचा वापर कमी करून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. असे झाले तर बहुतांश किडींचेसुद्धा आपोआपच निर्मूलन होईल आणि तोट्यात सुरू असलेला शेती व्यवसाय भविष्यात फायद्याचा ठरेल. ■

९८८१७१६०२७

कानोसा

अमोल पुसदकर

नेता ऐसा मिळे आम्हास...!

२१ जून १९४० रोजी परम पूजनीय डॉक्टर हेडगेवारांचे देहावसान झाले. डॉक्टर म्हणजे नुसते संघ संस्थापक नव्हते तर ते संघ कार्याचा प्राण होते. त्यामुळे स्वयंसेवकांमध्ये अतीव दु:ख निर्माण झाले. मोठमोठे कार्यकर्ते शोकाकुल झाले. स्वाभाविकपणे सर्व लहानथोरांच्या मनामध्ये असे प्रश्न निर्माण झाले की, आता जशा इतर सर्व संघटना त्यांच्या संस्थापकांच्या निधनानंतर मोडकळीस येतात किंवा समोर चालू शकत नाही तसेच संघाचेही होणार का? स्वयंसेवक यापुढेही आज्ञा पाळतील का? एकजुटीने काम करतील का? की, काही दिवसांनी संघ बंद होऊन जाईल. डॉक्टर गेल्यानंतर त्यांच्या तेराव्या दिवशी म्हणजे ३ जुलै १९४० रोजी संध्याकाळी ६ वाजता नागपूरच्या रेशीमबाग संघ स्थानावर झालेल्या कार्यक्रमांमध्ये नागपूरचे त्यावेळेसचे प्रांत संघचालक बाबासाहेब पाध्ये यांनी पूजनीय डॉक्टर हेडगेवार यांच्या इच्छेनुसार माधवराव गोळवलकर हे आजपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक झाले आहेत, असे घोषित केले व त्यांनी श्रीगुरुजींना पहिला सरसंघचालक प्रणाम केला. त्यावेळी विविध मान्यवरांची भाषणे झालीत. पूजनीय डॉक्टर हेडगेवार यांचे काका आबाजी हेडगेवार यांचेही भाषण झाले. आपल्या भाषणात ते म्हणाले की, आपले डॉक्टर आपल्यातून गेलेले नाही तर माधवराव गोळवलकर हेच आज आपले डॉक्टर झाले आहेत. त्यांच्या सर्व आदेशांचे, हे डॉक्टरांचे आदेश आहेत, असे समजून आपण पालन केले पाहिजे.

पूजनीय श्रीगुरुजी जेव्हा सरसंघचालक झाले त्यावेळेस त्यांचे वय अवघे ३४ वर्षे होते. सरसंघचालक म्हणून आपले पहिले भाषण देताना श्रीगुरुजी म्हणाले की, मी आज आपणांसमोर उभे राहून काही बोलू शकेल असे मला वाटत नाही. कारण माझे मन दु:खाने भारावलेले आहे आणि माझ्या शिरावर भले मोठे ओझे आले आहे. डॉक्टर आपल्यातून गेले, ही कल्पना असहनीय आहे. आपले कार्य केवळ भावनेवर आधारलेले नसून विचारांवर आणि सिद्धांतांवर आधारलेले आहे. ते वस्तुस्थिती लक्षात घेऊन चालणारे आहे.

डॉक्टर हेडगेवार महान द्रष्टा, त्यागी आणि परिश्रमी होते. स्वतःच्या जीवनाचा फार मोठा आदर्श त्यांनी आपल्यासमोर उभा केला आहे. आईचा प्रेमळपणा, वडिलांची दक्षता आणि शिक्षकाचे कौशल्य या तिन्ही गोष्टी त्यांच्या ठायी एकवटल्या होत्या. ते माझे आराध्य दैवत होते. त्यांचे पूजन ही माझ्या जीवनातील सर्वांत अधिक आनंद देणारी गोष्ट आहे. त्यांचे पूजन कधीही व्यक्तिपूजन होऊ शकत नाही. त्यांना मुळी व्यक्तिगत जीवनच नव्हते. त्यांचे सगळे जीवन तत्त्वमय आहे. त्यांचे सगळे जीवन त्यागमय आहे. ते कर्तव्यमय आणि सेवामय आहे.

श्रीगुरुजी म्हणतात की, डॉक्टरांनी माझ्यासारख्या अगदी सामान्य माणसावर एवढ्या मोठ्या कार्याची धुरा सोपविलेली पाहून मला श्रीरामकृष्ण परमहंसांच्या एका शिष्याची आठवण होत आहे. सर्वजण त्याला अगदी ठोंब्या समजत असत. सहा महिने प्रयत्न करूनही त्याला साधी बाराखडी लिहिता आली नाही. श्रीरामकृष्णांना पूजेसाठी फुले आणून देण्याचे कार्य मात्र तो अगदी नित्यनियमाने करीत असे. इहलोकीला संपवतेवेळी श्रीरामकृष्ण देवांनी त्याच्या मस्तकी हात ठेवला. झाले. थोड्याच दिवसात तो एक विद्वान अधिकारी पुरुष बनला. तो उपनिषदांवर उत्तम प्रवचने देऊ लागला. महापुरुष आपल्या स्पर्शाने व आशीर्वादाने कोणालाही फार मोठ्या योग्यतेला चढवू शकतात.

ज्यांना संघामध्ये व बाहेर सर्वत्र लोक श्रीगुरुजी म्हणून ओळखायचे ते माधव सदाशिवराव गोळवलकर उपाख्य श्रीगुरुजी यांचा जन्म नागपूर येथे इंग्रजी दिनदर्शिकेनुसार १९ फेब्रुवारी १९०६ रोजी विजया एकादशीला झाला. श्रीगुरुजी लहानपणापासूनच हुशार होते. परंतु संघात आल्यानंतर त्यांनी आपली सर्व विद्वत्ता संघ कार्याच्या विकासासाठीच खर्च केली. श्रीगुरुजींचा पिंड आध्यात्मिक होता. त्यांनी आपली सर्व आध्यात्मिकता संघटनेच्या कार्यामध्ये समर्पित केली. १९४० ते १९७३ म्हणजेच गुरुजी त्यांच्या निधनापर्यंत सरसंघचालक होते. या ३३ वर्षांच्या कालखंडामध्ये शक्तीचा कण आणि कण व आयुष्याचा क्षण आणि क्षण त्यांनी संघ कार्यासाठी समर्पित केला. 'गाडी मेरा घर है ऐसा कहकर, जिसने की संचार तपस्या.' ३३ वर्षांच्या सरसंघचालक पदाच्या काळामध्ये रेल्वेची गाडी हेच जणू त्यांचे घर झालेले होते. पूजनीय श्रीगुरुजींचे व्यक्तिमत्त्व हे आत्मविलोपी, संघशरण होते. एकदा पूजनीय दादा म्हणजे पांडुरंग शास्त्री आठवले गुरुजींना म्हणाले की, गुरुजी, संघासाठी तुमचे योगदान खूप मोठे आहे. त्यावर श्रीगुरुजी म्हणाले की, पूजनीय डॉक्टरांनी जो संघ माझ्या हातात दिलेला आहे तो जसाच्या तसा जरी मी पुढील पिढीपर्यंत पोहोचवू शकलो तरी मी त्यात धन्यता मानेल.

१२ जुलै १९४९ रोजी संघावरचा प्रतिबंध उठवण्यात आला. १३ जुलै रोजी श्रीगुरुजींना बैतुल तुरुंगामधून सोडण्यात आले. संघ सुरू झाल्याची घोषणा श्रीगुरुजींनी करताच गावागावांमध्ये संघाच्या शाखा पुन्हा सुरू झाल्या. स्वयंसेवक उत्साहाने कामाला लागले. श्रीगुरुजींचा देशभर प्रवास सुरू झाला. जेथे जेथे श्रीगुरुजी जायचे त्या त्या ठिकाणी हजारोंच्या संख्येने स्वयंसेवक व जनता त्यांच्या स्वागतासाठी यायची. श्रीगुरुजींचे स्वागत एखाद्या विजेत्याप्रमाणे जनता करीत होती. स्वयंसेवकांना खूप आनंद होत होता. १९४७ साली देशभर देशाच्या विभाजनाचे वातावरण निर्माण झालेले होते. पंजाबचा जो भाग पाकिस्तानात जाणार होता तेथील हिंदू गावांवर मुस्लिम गुंडांचे हल्ले होत होते. जवळपास सर्व देशभरच मुस्लिम गुंडांनी दंगे सुरू केलेले होते. अशा परिस्थितीत श्रीगुरुजी पंजाबमध्ये सातत्याने प्रवास करीत होते. स्वयंसेवकांना धीर देत होते व असहाय जनतेला मदत करण्याचे आवाहन करीत होते. श्रीगुरुजी स्वयंसेवकांना म्हणाले की, संघाचा स्वयंसेवक हा आपले गाव सोडून भारतात येणारा त्या गावचा शेवटला माणूस असायला पाहिजे. श्रीगुरुजींच्या या आवाहनावर संघाच्या शेकडो स्वयंसेवकांनी हिंदू समाजाच्या रक्षणाकरिता आ

महसूलमधूनही आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण व्हावेत : बावनकुळे

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २४ फेब्रुवारी

करिअरच्या धावपळीत आपल्या अंगीभूत कलागुणांना मागे ठेवावे लागते. त्यामुळे महसूल विभागातील खेळाडूंना मिळालेली ही संधी असून कामाचे नियोजन करून कला, क्रीडा क्षेत्रामध्ये प्रावीण्य प्राप्त करावे. महसूल मधूनही राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांना गवसणी घालणारे क्रीडापटू तयार झाल्यास मला अधिक आनंद होईल, अशी अपेक्षा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे.

काल रविवारी रात्री राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित होते. २१, २२ व २३ फेब्रुवारीला आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेचा समारोप त्यांच्या हस्ते झाला. यावेळी आपल्या संबोधनात त्यांनी क्रीडा व कलाक्षेत्रातील गुणवंतांना नोकरी बढतीमध्ये प्राधान्य दिले जाईल असे स्पष्ट केले. महसूल मधून ऑलिंपिकला गवसणी घालणारा एखादा खेळाडू तयार झाल्यास तो आनंदाचा क्षण असेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

महसूल मंत्री खास महसूल कर्मचाऱ्यांच्या आग्रहास्तव आपल्या व्यस्त कार्यक्रमात नागपूर वरून नांदेड येथे समारोपीय कार्यक्रमाला उपस्थित झाले.यावेळी महसूल मधील विविध संघटना, कर्मचारी संघटना, वरिष्ठ अधिकारी यांनी देखील आपल्या मागण्या त्यांच्या समोर सादर केल्या. या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर प्रामुख्याने खासदार डॉ.अजित गोपछडे, आ.बाबुराव कदम कोहळीकर, आ. तुषार राठोड, आ. राजेश पवार, विभागीय आयुक्त दिलिप गावडे, विशेष पोलीस महानिरीक्षक शाहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, नांदेडचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार,महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांचे

जिल्हाधिकारी व वरिष्ठ अधिकारी, महसूल मधील संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी महसूलच्या आकृतीबंध पासून तर महसूल मधील नोकर भरतीपर्यंत अनेक विषयांवर तातडीने निर्णय घेण्याचे संकेत त्यांनी दिले. तसेच महसूल विभागाच्या आस्थापनांमध्ये वाढ करण्याचे प्रस्ताव आहेत. राज्यात अनेक ठिकाणी अपर जिल्हाधिकारी कार्यालय, अपर तहसीलदार कार्यालय, यासोबतच लातूर किंवा नांदेडमध्ये विभागीय महसूल आयुक्तालय करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे त्यांनी सांगितले. महसूल खात्यातील मोक्याच्या पोस्टिंग आता कुणाच्या शिफारसीने नाही तर मेरीटवर होतील, असे सांगताना त्यांनी महसूलमध्ये जवळपास १५ नवीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, ६५ अप्पर तहसीलदार कार्यालय तयार करण्याचे प्रस्ताव विचाराधीन असल्याचे सांगितले. महसूल विभागातील कर्मचाऱ्यांनी नाविन्यपूर्ण कल्पनांवर काम करावे. शासनाला आपल्याकडच्या अशा नाविन्यपूर्ण कल्पनांची माहिती द्यावी. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करावा. महसूल विभागातील सुनावण्या घेताना AI चा वापर पुढील काळात होईल, सुनावण्यामध्ये AI तंत्र अतिशय उपयोगी ठरणार असून, निकालपत्रासाठी AI ची मदत घेऊ अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

गेल्या १० वर्षात १२ हजार प्रकरणे महसूल विभागात निर्णयासाठी पडून आहेत. रोज १०० सुनावण्या घेतल्या तरी ते कमी होणार नाहीत, त्यामुळे AI ची मदत घेणे काळाची गरज आहे, असे ते म्हणाले. नांदेड येथे १२ वर्षाच्या प्रदीर्घ काळानंतर आयोजित क्रीडा स्पर्धासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व टीमचे त्यांनी अभिनंदन केले. राज्यस्तरीय महसूल क्रीडा स्पर्धेसाठी एक कोटी अनुदान दरवर्षी देणार व दरवर्षी राज्यस्तरीय महसूल क्रीडा महोत्सव होईल, अशी घोषणा उपस्थित खेळाडूच्या समक्ष केली. यावेळी कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले ,निलंबन आणि वेतनवाढ रद्द करण्याच्या फाईलवर निर्णय घेण्याची वेळ महसूल मंत्र्यांवर आणू नका, इतके चांगले कामकाज, जनतेशी समन्वय, कार्यालयीन शिस्त आणि पारदर्शी राहा, महसूल हा महाराष्ट्राचा चेहरा आहे. महसुल खाते क्रमांक एकचे राहील यासाठी प्रयत्न करा असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी त्यांच्या हस्ते विभागीय स्पर्धेतील विजेते कोकण विभागाला प्रथम, दुसरा क्रमांक यजमान छत्रपती संभाजी नगरला तर पुणे विभागाला तिसरा क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद बहाल करण्यात आले.

अज्ञात वाहनाच्या धडकेत हरणाचा मृत्यू

तभा वृत्तसेवा
नायगांव,दि. २४ फेब्रुवारी

फॉरेस्ट विभागातील प्रशासकीय जबाबदार अधिकारी यांच्या निष्क्रियतेमूळे तर वनरक्षकांच्या आळशी प्रवृत्ती मूळेअंजणी-चिटमोगरा फाट्या जवळील वळणाचा रस्ता ओलांडून पाण्याच्या शोधात बिजुर येथील मानवी वस्तीकडे मार्गक्रमण करीत आसलेल्या मादी हरीणाचे देगलूर नांदेड या राज्यमहा मार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला.

गेल्या काही वर्षापासून जंगलातील वृक्षांची कत्तली होत असल्याने पर्यावरणातील सुंतूलन दिवसेंदिवस बदलत असल्याचे चित्र दिसून येत आहे तर दूसरीकडे राज्य शासनाने पर्यावरण संतुलित राहावे या अनुषंगाने दरवर्षी आर्थिक बजेटमध्ये स्वतंत्र तरतूद करून.सामाजिक वनी करणाच्या वतीने झाडे लावा झाडे जगवा हे अभियान खूप मोठ्या प्रमाणात राबविण्यात येते. तर दुसरीकडे फॉरेस्ट विभाग मात्र वनाची व वनातील वन्य प्राण्यांच्या देखभालीसाठी दरवर्षी उन्हाळ्यात पाणवठे बांधल्याचा कागदोपत्री आराखडा तयार करून शासनाच्या नगदी स्वरूपातील बजेटचा विल्हेवाट लावण्यात मात्र तरबेज वास्तविक वास्तवात मात्र वनातील प्राण्यासाठी असलेले पानवठे मात्र कोरडे ढाकच असल्यामुळे दि.२३ फेब्रुवारी २०२५ रोज रविवारी सायंकाळी सातच्या सुमारास अंजनी/चिट मोगरा फाट्या जवळील देगलूर-नांदेड या राज्य महामार्गा वरून रस्ता ओलांडून बिजूरकडे मानवी वस्तीकडे पाण्याच्य शोधात मादी हरणाचे अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला आसल्याचे चित्र पाहायला मिळाले आहे. यावेळी रामतीर्थ पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक परगेवार,बिट जमादार शेख, पो.हे.कॉ सोनकांबळे, ईजळ कुंटे, सुर्यवंशी हे देगलूरहून रामतीर्थ पोलीस ठाण्याकडे येताना पाहिले असता. रामतीर्थ ठाण्याचे सपोनी श्रीधर भागवतराव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ संबंधित फॉरेस्ट विभागाच्या अधिकाऱ्यांना कळविल्याने यावेळी देगलूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी निखिल हिवरें यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक सहदेव दोसलवाड, सुभाष नाईक, राजेश पिंजरवाड, शिवराज बटलवार यांनी पंचनामा करून पुढील शासकिय नियमा प्रमाणे कार्यवाही पूर्ण केली.

परंतु दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत आहे तर दुसरी कडे वनातील पाणवठे हे कोरडे ढाक असल्यामुळे वन्य प्राणी हे पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे मार्गक्रमण करत आहे त. त्यामूळेच या परिसरातील मादी हरीणाच्या या मृत्यू मुळे बिजूर, अंजनी, चिट मोगरा पंचक्रोशीतील नागरिकांनी फॉरेस्ट विभागातील अधिकाऱ्यांच्या व वनरक्षकाच्या बेजबा बदार वर्तनामुळेच वनातील हरिण, मोर, ससे यासारखे छोटे-छोटे मृत्यूचे बळी ठरत आहेत. त्या मुळे ग्रामीण भागातील नागरिकांतून चांगल्याच चर्चा रंगू लागल्या आहेत.

संक्षिप्त वृत्त

कुंडलेश्वर देवालयात विविध कार्यक्रम

कुंडलवाडी-येथील कुंडलेश्वर देवालयात महाशिवरात्री निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कुंडलवाडी येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी कुंडलेश्वर देवालयात महाशिवरात्री निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२४ फेब्रुवारी २०२५रोजी दु.४वाजता चौधवे महाराजांचे प्रवचन रात्री ८वा. विश्वनाथ भोगले यांचे गायन दि.२५ फेब्रुवारी २०२५रोजी दु.३ वा. ह.भ. प. अनिरुद्ध महाराज यांचे प्रवचन दि.२६ फेब्रुवारी २०२५रोजी साय.६ ते ९वा.उमा महेश्वर रुद्राभिषेक व शुभ विवाह सोहळा नंतर पालखी मिरवणुक ह. भ. प. पाळेकर महाराज यांचे शिव कीर्तन होणार आहे तरी सर्व भाविक भक्तानी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे संयोजकांच्या वतीने कळविले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांची भरती

नांदेड-महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागात सन २०२५-२६ या सत्रासाठी वेगवेगळ्या व्यवसायासाठी एक वर्षासाठी प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांसाठी भरती करण्यात येणार आहे. या शिकाऊ उमेदवार भरतीत नांदेड जिल्ह्यातील आयटीआय/अभियांत्रिकी पदवी, पदवीका उत्तीर्ण उमेदवारांचीच शिकाऊ उमेदवार म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्याव्यतीरीक्त इतर जिल्हयातील आयटीआय/अभियांत्रिकी पदवी, पदवीका उत्तीर्ण उमेदवारांचा अर्ज व मागील तीन वर्षापुर्वी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही, असे राज्य परिवहन विभागाचे विभाग नियंत्रक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे. यात मेकॅनिक मोटर व्हेईकल -४५, मेकॅनिक डिझेल- ४२, शिट मेटल वर्क्स-१८, टो इलेक्ट्रीशियन-६, मेकॅनिक रेफ्रिजरेशन अँड एअर कंडीशनर-८, पेंटर(जनरल) -४, वेल्डर (गॅस न्ड इलेक्ट्रीक)-०४, अभियांत्रिकी पदवी, पदविका (मेकॅनिकल टोमोबाईल मेकॅनिक /इंजिनीअर)-२ अशी एकुण १२९ पदे ऑनलाईन पध्दतीने भरण्यात येणार आहेत. त्यासाठी आयटीआय उत्तीर्ण किंवा शिकाऊ उमेदवार भरती करण्यात येणाऱ्या विहीत केलेल्या व्यवसायाचे व्होकेशनल अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व ॲटो इंजिनिअरींग टेक्निशिअन कोर्स उत्तीर्ण उमेदवारांना www.apprenticeshipindia.gov.in या वेबसाईटवर स्वत: चे रजिस्ट्रेशन करावे अभियांत्रिकी पदवी, पदवीका उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांनी NTS पोर्टलवरील www.mhrdnats.gov.in या वेबसाईटवर स्वत:चे रजिस्ट्रेशन करावे. व रजिस्ट्रेशन झाल्यावर एमआरटीसी डिव्हीजन नांदेड या आस्थापनेकरीता ऑनलाईन अप्लाय करुन रा.प. महामंडळाने विहीत नमुन्यातील छापील अर्ज भरुन सादर करणे आवश्यक राहील. हे छापील अर्ज २७ फेब्रुवारी ते १० मार्च २०२५ रोजी ३ वाजेपर्यंत शनिवार, रविवार व सुटटीचा दिवस विभाग नियंत्रक यांचे कार्यालय रा.प.नांदेड येथे मिळतील व लगेच स्वीकारले जातील. या अर्जाची किंमत खुल्या प्रवगाकरीता ५९० रुपये व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी जातीचा दाखला सादर केल्यास २९५ रुपये आहे.

मुदखेडचे जेष्ठ पत्रकार गंगाधर डांगे यांना मराठवाडा भुषण पुरस्काराने सन्मानित

मुदखेड-मुदखेडचे ज्येष्ठ पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते गंगाधर डांगे यांना वैदर्भीयनाथ चॅरिटेबल ट्रस्टच्या मराठवाडा भुषण पुरस्काराने दि. २३ फेब्रुवारी रोजी संत गाडगे बाबां यांच्या जयंती दिनानिमित्त महेश

भवन श्री क्षेत्र लाड कारंजा जि. वाशिम येथे पार पडलेल्या सत्कार सेवाव्रतींचा कार्यक्रमात आ. सईताई डहाके यांच्या हस्ते शाल श्रीफळ व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला . वैदर्भीयनाथ चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने पहिल्यांदाच राज्यस्तरीय पुरस्कार कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी कारंजा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सईताई प्रकाशदादा डहाके या होत्या तर या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुने म्हणून मुर्तिजापूर विधान सभेचे आमदार हरिषजी पिंपळे,विदर्भ लोक कलावंत संघटनेचे अध्यक्ष संजयजी पडोळे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश कार्याध्यक्ष निलेशजी सोमानी, गजानन कृषी बाजार समिती वाशिमचे संस्थापक अध्यक्ष गिरधारी लाल सारडा तर वैदर्भीयनाथ चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्षा सौ.पुनम पवार, सचिव एकनाथ पवार हे उपस्थित होते.

भगवानराव गोडसे यांचे निधन

मुदखेड-ज्येष्ठ नागरिक भगवानराव दिगंबरराव गोडसे (वय ७०) यांचे दि.

२४ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, नातवंड असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर मुदखेड येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. राजकुमार गोडसे यांचे ते वडील तर नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष बालाजी गोडसे व काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष कैलास गोडसे यांचे ते काका होत.

संगीत शंकर दरबारचे आज उद्घाटन

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २४ फेब्रुवारी

संगीताच्या क्षेत्रातील प्रतिष्ठित व लोकप्रिय कार्यक्रम संगीत शंकर दरबारचे मंगळवारी २५ फेब्रुवारी रोजी सायं. ५.३० वाजता यशवंत महाविद्यालयाच्या प्रांगणात उद्घाटन होणार असून, पहिल्या दिवशी सुप्रसिद्ध गायिका साधना सरगम यांच्या सुगम संगीताचा कार्यक्रम होणार आहे.

मंगळवारी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली व जागतिक कीर्तीचे सतार वादक पद्मभूषण पं. बुधादित्य मुखर्जी यांच्या हस्ते या सोहळ्याचे उद्घाटन होईल. यावेळी माजी आमदार अमिताताई चव्हाण, आ. श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आदी उपस्थित राहतील. यंदाच्या संगीत शंकर दरबार सोहळ्याच्या पहिल्या दिवशी सुप्रसिद्ध गायिका श्रीमती अनुराधा नांदेडकर (हिंगोली) यांच्या यांचा जीवनगौरव पुरस्काराने सत्कार होणार असून, त्यानंतर साधना सरगम यांच्या सुरांची मैफिल रंगणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचिव तथा माजी पालकमंत्री डी पी सावंत, सहसचिव प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर व कोषाध्यक्ष ॲड. उदय निंबाळकर यांनी केले आहे.

नांदेड-जगद्गुरु नरेंद्रचार्य महाराज यांच्या बद्दल अपशब्द काढणाऱ्या काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार याच्या निषेधार्थ नांदेड मध्ये मोर्चा काढण्यात आला. (छाया. करणसिंह बैस)

प्राणिताताई देवरे यांनी घेतल्या साहित्यिकांच्या भेटी

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २४ फेब्रुवारी

दिल्ली येथे ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची सांगता झाली शेवटच्या दिवशी रविवारी २३ रोजी दिल्लीत मराठीचा गजर होता.राजकीय क्षेत्रात वावर असतानाही सांस्कृतिक व मराठी साहित्यांची आवटी गोडी असणाऱ्या प्राणिताताई देवरे-चिखलीकर या दिवसभर संमेलनात रमल्या. परिसंवाद, मुलाखत, चर्चासत्र त्यांनी श्रवण केले

पुस्तके खरेदी केली साहित्यिकांच्या भेटीगाठी घेतल्या .वाचल तर वाचाल ही चळवळ गावोगावी गतिमान होणे आजच्या काळाची गरज आहे अशी प्रतिक्रिया प्राणिताताई देवरे चिखलीकर यांनी व्यक्त केली. देशाच्या राजधानीत ९८वे साहित्य संमेलन पार पडले. समारोपाच्या दिवशी प्राणिताताई याना साहित्य संमेलनाचा आनंद घेता आला सारस्वतांच्या व्यासपीठावर देशाचे पंतप्रधान मोदी व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार एकत्रित आले त्याची खूप चर्चा झाली. राजकीय व सामाजिक क्षेत्रात प्रभावी कार्य करणाऱ्या प्राणिताताई देवरे चिखलीकर यांनी दिल्लीत रविवारी दिल्लीत मराठी साहित्य संमेलनात हजेरी लावली मराठी साहित्य संमेलनाचा रसास्वाद घेतला.आनंद घेतला. महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक, जेष्ठ पत्रकार,विचारवंत,लेखक यांच्या भेटी घेण्याचा योग त्यांना आला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यानंतर पहिल्यांदा व ७० वर्षानंतर राजधानीत साहित्य संमेलन यशस्वीपणे पार पडले.

संमेलनाध्यक्षा ताराबाई भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य संमेलन पार पडले उद्घाटन सोहळ्याला देशातील दोन दिग्गज नेत्यांसह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते तर समारोपाला राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या प्रमुख उपस्थित संमेलनाचा समारोप करण्यात आला.

प्रमुख राजकीय नेते त जेष्ठ पत्रकार तोरसेकर एन. डी. टीव्हीचे पत्रकार राम शिंदे, पुढारीचे पत्रकार प्रथमेश तेलंग, जेष्ठ पत्रकार अशोक वानखेडे, बारामतीचे दत्ता सावंत, नांदेडचा सोशल मीडियातील स्टार बळी डिकळे, पुणे येथील श्रीमंत स्टुडिओचे योगेश पाटील यांच्यासह साहित्यिक, लेखक, कवी, विचारवंत, आदीजणांच्या भेटीचा योग आला माझ्या मराठीची बोलू कौतुके, परि अमृतातेहि पैजासी जिंके याची महिती दिल्ली व देशवासियांना कळाली. समृद्ध भाषेचा वारसा तसेच साहित्य ,नवीन पिढीला कळले पाहिजे वाचन चळवळ गतिमान झाली पाहिजे तरच भवितव्य मुद्रित साहित्याचा रसास्वाद पुढच्या पिढीसाठी उपयुक्त ठरणार आहे. दिल्लीचे तख्त रखीतो महाराष्ट्र माझा...याच अनुभव आला अशीं भावना प्राणिताताई देवरे चिखलीकर यांनी व्यक्त केल्या.

चार साहिबजादे शिख युथ फेस्टीव्हलच्या बक्षिसांचे संतांच्या हस्ते वितरण

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २४ फेब्रुवारी

सिख एज्युकेशन वेलफेअर असोसिएशन सेवा या संस्थेचे अध्यक्ष जरनैलसिंघ गाडीवाले यांच्या वतिने श्री. गुरुगोबिंद सिंघ यांचे चार पुत्र अर्थात चार साहिब जादे यांच्या पावन स्मृतिप्रित्यर्थ घेतलेल्या अकराव्या सिख युथ फेस्टीव्हल मधील विजेत्यांना संत बाबा बलविंदरसिंघ मुखी गुरुव्दारा लंगर साहिब, बाबा तेजासिघ मुखी गुरुव्दारा मातासाहिब यांच्या शुभहस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

दिवान टोडरमल मिनी स्टेडियम, खालसा हायस्कुल येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून गुरुव्दारा बोडांचे नवनियुक्त अधिक्षक गुरुबचनसिंघ शिलेदार, सहाय्यक अधिक्षक बलविंदरसिंघ फौजी,

जयमलसिंघ ढिल्लो, भाजप उपशहर अध्यक्षा पुनम कौर धुपिया यांची प्रमुख उपस्थिती होती. या सर्व मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. दोन दिवसीय चाललेल्या या फेस्टीव्हलमध्ये गुरुबाणी कंठ, पगडी बांधणे, हॉकी, व्हॉलिबॉल, बॅडमिटन अशा स्पर्धा घेण्यात आल्या. गुरुबाणी कंठ स्पर्धा महिला गटाचे बक्षिस नवाब मलेरकोटला शेर मोहम्मद खान यांच्या नावाने देण्यात आले असून प्रथम तेजबिर कोर रामगडीया, व्दितीय जपनिश कौर हरप्रितसिंघ लांगरी, तृतीय अविनाश कौर तर पुरुष गटाचा बक्षिस भाई मोतीरामजी मेहरा यांच्या नावाने देण्यात आला असून प्रथम जसविंदरसिंघ मानवतवाले, व्दितीय इंदरजितसिंघ गुरुमितसिंघ, तृतीय अंगदसिंघ मनिंदरसिंघ, तर पगडी बांधणे स्पर्धेचे बक्षिस सहिबजादा अजितसिंघजी यांच्या नावाने देण्यात आले याचे प्रथम किरपासिंघ रामगडीया, व्दितीय महादिपसिंघ सरदार, तृतीय भूपिंदरसिंघ कडेवाले तसेच हॉकी १४ वर्ष वयोगटात प्रथम साहिबजादा जुजारसिंघजी, व्दितीय साहिबजादा जोरावरसिंघजी, तृतीय साहिबजादा बाबा फतेहसिंघजी या संघाने पदक पटकावली. व्हॉलिबॉलचे बक्षिस लखीशाह बंजारा यांच्या नावाने देण्यात आले असून उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वाटप स्पर्धकांना करण्यात आले. सेवा संस्थेचे चेअरमन जरनैलसिंघ गाडीवाले यांनी सिख युथ फेस्टीव्हलचे आयोजन केले होते. हा उपक्रम खेळाडूंना प्रोत्साहित करणारा असून व्यसनापासून दूर राहण्यासाठी प्रेरित करणारा व कल्याणकारी आयोजन असल्याचे मनोगत उपस्थित संत, महापुरुष व मान्यवरांनी केले.

हा सिख युथ फेस्टीव्हल यशस्वी करण्यासाठी कुलप्रकाशसिंघ लिखारी खेमसिंघ पुजारी, राजेंद्र नंगनूर, मितसिंघ मुनीम, हरदिपसिंघ गाडीवाले, हरप्रितसिंघ कपूर, तुलजेश यादव, पवनजोतसिंघ गाडीवाले आदींचे सहयोग लाभले.

लोहा-कंधार रोडवरील कापूस खरेदी केंद्राला आग

तभा वृत्तसेवा
लोहा ,दि. २४ फेब्रुवारी

लोहा-कंधार रोडवरील कापूस केंद्रातील कापसाला विद्युत तारेच्या ताराला तर घर्षण होऊन मोठी आग लागली या मध्ये दोन व्यापाऱ्यांचे लाखों रुपयांचे नुकसान झाले. या घटनेमुळे व्यापाऱ्यांनी उपसभापती व सचिवाला घेराव घातला. सोमवारी दुपारी एक वाजताच्या सुमारास जोराचा वारा आला त्यामध्ये विद्युत तारेच्या स्पर्षाने आग लागली. अवघ्या काही सेकंदात आग वनव्यासारखी पेटली. यावेळी व्यापारी, मजूर यांनी तत्परता दाखवून खाजगी टँकरच्या मध्यामातुन आग आटोक्यात आणली. या आगीत रंगनाथ भुरे तर दुसरे बळीराम सूर्यवंशी यांचे लाखोंचे नुसकान झाले.

जिगळा येथील तलावात आढळला मृतदेह

तभा वृत्तसेवा
नायगांव ,दि. २४ फेब्रुवारी

नरसी पासून येथून जवळच असलेल्या जिगळा तलावात पंचेचाळीस वर्षीय एका अनोळखी पुरुषाचा सडलेल्या अवस्थेतील मृतदेहआढळून आल्याने जिगळोसह परिसरात खळबळ उडाली आहे.

मासेमारी करण्यासाठी गेलेल्यांना पंचेचाळीस वर्षीय एका पुरुषाचा मृतदेह पाण्यावर तरंगत असल्याचे दिसून आले. त्यांनी लगेच याबाबत रामतीर्थचे ठाणेदार सपोनी श्रीधर भागवतराव जगताप यांना कळविले आसता सपोनि श्रीधर जगताप तत्परता दाखवली व आपल्या सह पोलिसांचा फौज फाटा घेऊन घटना स्थळी पोहोचले. परंतू अंधाराचा काळोख असल्यामुळे मृतदेह बाहेर काढता आले नाही. परंतु रविवारी सकाळ पासूनच सपोनि श्रीधर जगताप यांच्या मार्गदर्शना खाली बीट जमादार शिवशंकर शिंदे यांनी आपल्या दिमती ला ठाण्यातील काही कर्मचाऱ्यांना घेऊन घटना स्थळी पोहचून बिलोली येथील काही भोई समाजातील पट्टीच्या पोहणाऱ्या काही तरुण युवकांच्या मदतीने तो मृतदेह तलावा बाहेर काढण्यात यश आले. हा अनोळखी पंचेचाळीस पुरुष युवकाचा मृतदेह मागील पाच सहा दिवसा पूर्वी पासून पाण्यात असल्याने ते पुर्णतः सडलेल्या परिस्थितीमध्ये असल्यामुळे त्या मृत देहाची व्यवस्थितरित्या अंत्यविधी करण्यात आले. रामतीर्थ ठाण्यामध्ये आकस्मित मृत्यूचा गून्हा नोंद करुन.स.पो.नि श्रिधर जगताप यांनी पुढील तपास पोउपनि शिवाजी नरवाडे यांच्याकडे देण्यात आला.

महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर श्री विर ब्रहमेंद्र स्वामी मंदिरात कल्याणम महोत्सवमचे आयोजन

तभा वृत्तसेवा
किनवट,दि. २४ फेब्रुवारी

महाशिवरात्रीच्या शुभमुहूर्तावर सिरमेटी रोडवरील श्री वीर ब्रह्मेंद्र स्वामी मंदिर येथे दि २६ फेब्रुवारी रोजी कल्याणम महोत्सवम आयोजित केला असून श्री ओंकार शर्मा पत्की कुसलापूर यांच्या शुभहस्ते महारुद्हवन व कल्याणम होणार आहे. यानिमित्त अभिषेक पूर्णआहुती,तीर्थप्रसाद व महाप्रसादाचे आयोजन केले आहे या महोत्सवाला जास्तीत जास्त भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष किशन कोत्तापेल्लीवार यांनी केले आहे.

किनवटशहरापासूनहाकेचे अंतरावर असलेल्या सिरमेटी रोडवर श्री वीर ब्रह्मेंद्रस्वामी मंदिर हे जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते.यावर्षी महाशिवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर दि २६ फेब्रुवारी २०२५ रोजी कल्याणम महोत्सवमचे भव्य स्वरूपात आयोजन केले आहे. सकाळी ६ वा. मुख्यपुजारी रविंद्र पांडे यांच्याहस्ते अभिषेक होईल ११:३० वाजता पूर्णआहुती व नंतर तीर्थप्रसाद होईल.सकाळी ८ वा. श्री ओंकार शर्मा पत्की कुसलापूर यांच्या शुभहस्ते महारुद्रहवन होईल व दुपारी १२ वा कल्याणम होईल दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजल्यापासून महाप्रसादाचे वाटप होणार आहे.शुभप्रसंगी जास्तीत जास्त भाविक भक्तांनी उपस्थित राहून कल्याणम वेदीकेचे साक्षी बनून शुभाशीर्वाद घ्यावेत असे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष किशन कोत्तापेल्लीवार, उपाध्यक्ष रामलू गंनोजवार, सचिव राजु उटलावार, अंकुश उमडवार, प्रमोद श्रीपतवार, संतोष येलचलवार यांनी केले आहे.

बेटर हाफ

सोनाली ठेंगडी / ७७५५९३८८२२



उंचीत विजोड...पण जोडीला जोड!

आजही एखादा नवरा उंच आणि बायको ठेंगणी असेल तर त्यांना अमिताभ -जयाची जोडी म्हणतात. उंचीत विजोड असणारी अमिताभ आणि जया यांची जोडी आजही टिकून आहे. टिकून आहे, असे म्हणण्याचे कारण म्हणजे सिनेसृष्टीत टिकणारी जोडपी फारच कमी असतात. मुळात, आजकाल तर सेलिब्रिटी असो किंवा नसो, लग्न टिकणे हेच महाकठीण काम झाले आहे. घटस्फोटांचे वाढते प्रमाण समाजासाठी चिंताजनक आहे. अशास्थितीत एखाद्या जोडप्याने सिनेसृष्टीसारख्या क्षेत्रात सतत वावरतानाही आपले नाते कायम ठेवले तर त्यांचे कौतुकच व्हायला हवे. असेच कौतुकास्पद जोडपे आहे अमिताभ-जया.

एका मुलाखतीत अमिताभ यांनी सांगितले होते की, आमच्या प्रेमकहाणीची सुरुवात पुण्यापासून झाली असावी. कारण १९७० मध्ये जया यांनी पहिल्यांदा अमिताभ यांना पुण्यात पाहिले होते. पुण्यातल्या फिल्म इंस्टिट्यूटमध्ये अमिताभ बच्चन यांना पहिल्यांदा पाहिलं होतं, तेव्हाच त्यांची पर्सनॅलिटी आवडली होती, तेव्हाच मी इंप्रेस झाले होते, असेही या जया बच्चन यांनी सांगितले. त्याच दरम्यान एका मासिकाच्या कव्हरपेजवर अमिताभ यांनी जया भादुरी यांचा फोटो पाहिला आणि ते पाहताक्षणीच त्यांच्या डोळ्यात हरवले होते. 'जंजीर' हा दोघांचा एकत्र काम करण्याचा पहिला चित्रपट होता. त्याच चित्रपटाने अमिताभ यांना सुपरस्टार बनवले. रातोरात एखादा स्टार जन्माला यावा, असे त्यांच्या बाबतीत झाले. नंतर दोघांची भेट 'गुड्डी' या चित्रपटाच्या सेटवर झाली. तिथून खऱ्या अर्थाने त्यांची मैत्री झाली. असे म्हणतात की 'एक नजर' चित्रपट सोबत करताना दोघेही एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडाले होते. मात्र, हे प्रेम अजूनही व्यक्त झाले नव्हते. या प्रेमात शालिनता इतकी होती की चंद्रा बारोट या मित्राच्या घरी ते दोघे भेटायचे. कधीही हॉटेल किंवा सार्वजनिक ठिकाणी त्यांनी आपल्या प्रेमाचे प्रदर्शन केले नाही.

'जंजीर'चा हूर ते मंगळसूत्र

अमिताभ आणि जया यांच्यातील प्रेमाचा अंकूर फुलायला लागलाहोता, हे खरे असले तरी त्यांनी लग्नाचा विचार केला नव्हता. मात्र, दोघांचे लग्न त्यांच्याही अपेक्षेपेक्षा तडकाफडकी आणि अचानक झाले. 'जंजीर'च्या यशामुळे निर्माते इतके खुश होते की त्यांनी आपल्या टीमच्या सदस्यांसाठी परदेश दौरा आयोजित केला. यात अर्थातच अमिताभ आणि जया भादुरीही होते. हा लंडनचा दौरा ठरला होता. लंडनला जाणाऱ्या मित्रपरिवारात जया देखील आहेत, हे जेव्हा अमिताभचे वडील हरिवंश राय बच्चन यांना समजले तेव्हा ते म्हणाले की, जया आणि अमिताभ यांना लंडनला एकत्र जायचे असेल तर, दोघांनाही आधी लग्न करावे लागेल. याच कारणास्तव, दोघांनी लंडनला जाण्यापूर्वी ३ जून १९७३ रोजी एका साध्या घरगुती सोहळ्यात लग्न केले आणि त्याच दिवशी दोघे हनिमूनसाठी थेट लंडनला रवाना झाले होते.

भटजी लग्नासाठी तयार होईना!

या जोडप्याच्या लग्नादरम्यान अशा अफवा पसरल्या होत्या की, जया यांचे वडील तरुण कुमार भादुरी हे त्यांच्या आंतरजातीय विवाहाच्या विरोधात होते. मात्र, सत्य-स्थिती काहीतरी वेगळीच होती. स्वतः जया यांच्या वडिलांनी खुलासा केला होता. जया भादुरी यांचे वडील तरुण कुमार भादुरी हे प्रसिद्ध पत्रकार आणि लेखक होते. १९८९ मध्ये इलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडियासाठी लिहिलेल्या लेखात त्यांनी जया आणि अमिताभ यांच्या लग्नाबद्दल सविस्तर लिहिलं होतं. जया यांच्या वडिलांनी लिहिलं होतं की, मला केवळ एक चांगलं कारण जाणून घ्यायचं आहे की, ज्यामुळे मी आणि माझी पत्नी भादुरी-बच्चन यांच्या लग्नाच्या विरोधात जाऊ. अमिताभ यांच्यासारखा एक सुंदर माणूस ज्यांनी सिनेसृष्टीत स्वतःचं स्थान निर्माण करण्यासाठी संघर्ष केला. सुरुवातीच्या अपयशांमुळे ते निराश झाले नाहीत. त्यांनी खचून न जाता जंजीर सारखा सिनेमा केला. जंजीर चित्रपटाच्या यशानंतरच त्यांनी जयासमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवला आणि त्यानंतर मागे वळून पाहिलं नाही. आमची काहीच हरकत नव्हती ते बंगाली असुदे किंवा ब्राम्हणेतर असुदे. आम्ही कधी आक्षेप घेतलाच नाही. माझी दुसरी मुलगी देखील आहे तिनं रोमन कॅथलिकशी लग्न केलं आहे. असं तरुण कुमार भादुरी यांनी लिहिलं होतं.

जया यांच्या वडिलांनी पुढे लिहिलं की, बंगाली लग्नपद्धती साधारणपणे जास्त वेळ चालणारी असते पण खूप मनोरंजक असते. बंगाली धर्मगुरू ज्याला मी मोठ्या कष्टाने शोधून काढलं त्याने पहिले एक बंगाली ब्राम्हण असलेली जया आणि नॉन बंगाली ब्राम्हण अमिताभ यांचं लग्न लावून देण्यास विरोध केला. खूप प्रयत्नानंतर त्या पंडितची समजूत काढली आणि अमिताभ बच्चन आणि जया यांचं लग्न झालं. खरे सांगायचे तर हे एक प्रकारे 'गुप्त लग्न' झाले. कारण लंडनला जायचे म्हणून लग्न घाईने उरकले आणि आंतरजातीय असल्याने केवळ पाच वऱ्हाड्यांच्यासाक्षीने लग्न झाले.

या जोडप्याला अभिषेक आणि श्वेता अशी दोन अपत्ये असून तीन नातवंडं आहेत. सुखाने बच्चन कुटुंब जगत आहे. निदान जगासमोर तरी या कुटुंबाचे चित्र गुडीगुडी असेच आहे. पण काहीही असले तरी ही जोडी अजूनही टिकून आहे, ही फार मोठी बाब आहे.

असे म्हणतात ना, 'वक्त का पता नही चलता अपनोफ्ल के साथ, पर अपनोफ्ल का पता चलता है वक्त के साथ'. अमिताभ यांच्या जीवनातही आर्थिकदृष्ट्या गर्तेत लोटणारा काळ आला होता. त्यावेळी काही राजकीय मित्रांनी त्यांना सावरले आणि स्वतः अमिताभ यांनी 'केबीसी'च्या माध्यमातून छोट्या पडद्यावर काम करण्यास सुरुवात केली. दुसरी इनिंग इतकी जोरदार झाली की अमिताभ यांचेनाव शिखरावर पोहोचले. तेव्हापासून केवळ अभिनयच नव्हे तर हिंमतीने पुढे जाण्याच्या बाबतीतही हा नायक महानायक आदर्श ठरला. अमिताभ बच्चन यांच्या कारकिर्दीत अनेक अभिनेत्रींसोबत त्यांचे नाव जोडले गेले. त्यातही रेखाचा अध्याय तर फारच मोठा आणि आजही संवेदनशील मानला जातो. या सर्व कठीणतम परीक्षांमध्ये कुठेतरी या जोडप्याचा संसार अबाधित राहिला यामागे संस्कार हेच एकमेव कारण सांगता येईल. मर्यादांचे बंधन पाळणारे म्हणून अमिताभ यांचे नाव घेतले जाते. व्यावसायिकतेत त्यांचा हात कोणी धरत नाही, अभिनयात त्यांच्या आसपासही कोणी नाही. शतकातील महानायक असे बिरूद लावले जाणाऱ्या अमिताभ बच्चन यांच्यातील विनयशीलता सर्वांनाच अचंबित करते. या विनम्रतेमुळेच कदाचित त्यांना महानायक हा किताब अगदी शोभून दिसतो. कदाचित तेच म्हणत असावे की....

जब तक ना सफल हो
नींद चैन को त्यागो तुम
संघर्ष का मैदान छोडकर
कभी मत भागो तुम...!

रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/७८२१८१६४८५

रानभाज्या, रानफुले, रानफळे, रानशेंगा हे सर्वच निसर्गाच्या सान्निध्यात राहून बहरणारी मौल्यवान रान संपत्ती आहेत. यांचा आहारात समावेश केल्यानंतर आरोग्याला लाभ मिळतो आणि अनेक आजारांवरही ते फायदेशीर ठरतात. काही रानभाज्यांचे महत्त्व ओळखून, काही लोक शेतात लावतात तर कोणी घराच्या अंगणात लावतात. त्या भाजीला छत्तीसगडी भाषेत चेचभाजी म्हणतात.

आपल्या विदर्भात या भाजीला लटारीची भाजीसुद्धा

म्हणतात. ही भाजी तिन्ही ऋतूत मिळते. बऱ्याच ठिकाणच्या आठवडी बाजारातसुद्धा ही भाजी मिळते. गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यात मोठ्या प्रमाणात ही भाजी आवडीने खातात. कंवर या आदिवासी समाजातील लोक या भाजीचा आहारात समावेश करतात. या भाजीची पानं लांब असून, त्यांना बारीक, पिवळी फुलं आणि लाल रंगाची छोटी फळं लागतात. या भाजीच्या बिया तपकिरी रंगाच्या व त्रिकोणी असतात. ही भाजी कोवळी असतानाच तिचे डिरे म्हणजे कोवळे तुरे किंवा पालवी तोडतात. अगदी ते डिरे कोवळे लुसलुशीत असतात. पण, ही भाजी बनवताना तिला विळ्याने बारीक चिरल्यावर मात्र, तिच्यात कडूपणा येतो.

आपल्या विदर्भात या भाजीला लटारीची भाजीसुद्धा म्हणतात. ही भाजी तिन्ही ऋतूत मिळते. बऱ्याच ठिकाणच्या आठवडी बाजारातसुद्धा ही भाजी मिळते. गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यात मोठ्या प्रमाणात ही भाजी आवडीने खातात. कंवर या आदिवासी समाजातील लोक या भाजीचा आहारात समावेश करतात. या भाजीची पानं लांब असून, त्यांना बारीक, पिवळी फुलं आणि लाल रंगाची छोटी फळं लागतात. या भाजीच्या बिया तपकिरी रंगाच्या व त्रिकोणी असतात.

गुणकारी चेचभाजी

या चेचभाजीला हातानेच थोडे बारीक करतात किंवा कोणी कोवळ्या डिऱ्यासहीत ही भाजी बनवतात. जाणकार सांगतात की, ही भाजी खाल्ल्याने शरीरात ताकद येते. लहान्यांपासून ते मोठ्यांपर्यंत ही भाजी आरोग्यासाठी लाभदायक आहे. ही भाजी बनविण्याची पद्धत फार सोपी आहे. आधी त्या भाजीला स्वच्छ धुवून घेतात. नंतर पातेल्यात तेल टाकून ते तापले की, लसणाच्या तीन-चार पाकळ्या, दोन कांदे बारीक चिरून फोडणीत टाकतात. सोबतच सुकलेल्या लाल मिरच्या बारीक करून टाकतात. नंतर थोडी हळद, मीठ घालून सर्व मिश्रण एकजीव झाल्यावर ही चेचभाजी त्यात टाकतात. पाण्याचा थेंबही न टाकता ही भाजी शिजवली जाते. पण, ही भाजी शिजल्यानंतर मोकळी होत नाही. तिचा गोळा होतो. म्हणून भात किंवा भाकरीसोबत खाताना थोडी घेऊन खाल्ली जाते किंवा कोणी आंबील, पेजरा यासोबत तोंडी लावण्यासाठी या चेचभाजीची निवड करतात. ही भाजी शिजल्यावर इतका खमंग सुगंध येतो की, तोंडाला पाणी सुटते. या भाजीचे अनेक फायदे आहेत म्हणून नैसर्गिकपणे वाढणाऱ्या चेचभाजीचा आहारात समावेश केल्यास आपले आरोग्य सुदृढ व निरोगी राहण्यास मदत होते.

सोहळा शिक्षणाचा... उद्घोष उजळणीचा!

कांचन कोरडे पाण्डेय/८३२९४३६७३९

आज माझा वर्ग पहिला ते सर्व उच्चशिक्षणार्थ्यांना एक प्रश्न आहे. तुम्ही जेव्हा अभ्यास करता तेव्हा अधून मधून उठून मोठ्याने, अति उत्साहाने उद्गार काढावेसे वाटतात का, 'व्वा! किती किती मजा येते अभ्यास करण्यात, अभ्यास म्हणजे काय जाम रोमांचक कार्य आहे, यासारखे दुसरे मनोरंजन नाही किंवा उत्साहवर्धक खेळ नाही आणि तणावनाशक उपाय नाही! आनंदाने उड्या माराव्या वाटतात का? मनापासून दैवाचे व जन्मदात्यांचे आभार मानावेसे वाटतात का की, आपणास अभ्यासाची ही सुंदर संधी मिळाली? अभ्यास करताना तुमच्या उरी हर्ष आणि प्रफुल्लता संचारित होऊन काही तास किंवा काही मिनिटं तरी सलग फक्त अभ्यासाचीच ओढ लागते व दुसरे कुठलेही प्रलोभन तुमच्यावर काम करीत नाही तर तुम्ही खऱ्या अर्थाने ज्ञानार्थी आहात, निव्वळ परीक्षार्थी नाही.

आजच्या यंत्रयुगातील गॅजेटमय पिढीस हे कदाचित थोडे विचित्र वाटू शकते पण, खरंच अभ्यासात एकदा डुंबून बघा एक अपूर्व आनंद तुम्हास लाभेल. बोर्डाच्या परीक्षा जरी एव्हाना सुरू झालेल्या असल्या तरी, इतर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गांच्या वार्षिक परीक्षा अजून सुरू व्हायच्या आहेत तेव्हा, अभ्यासावर बोलणे गरजेचे वाटते. आमच्या बालपणी तसेच महाविद्यालयीन शिक्षणाच्या वेळीही आमच्यासाठी सर्वाधिक चित्त रोमांचित करणारी जर कुठली गोष्ट होती तर ती केवळ 'अभ्यास'! तितक्याच श्रेष्ठ दर्जाचा आल्हाददायी अनुभव जर दुसरा असेल आयुष्यात तर तो म्हणजे नोकरी करताना आणि प्रत्येकच नोकरीत असताना हाती आलेला प्रत्येकच उपक्रम! हे सगळे योग तेव्हा जुळून येतात जेव्हा आपण हाती आलेल्या प्रत्येक कार्यावर अर्थात आपल्या वर्तमानातील प्रत्येक स्थितीवर, त्या परिस्थितीने प्रस्तुत केलेल्या आव्हानांवर जीव ओतून प्रेम करतो व त्यांना मनोभावे जगतो. त्याचप्रमाणे अभ्यास जर मन लावून, समजून केला तर एक सोहळा वाटतो.

आजच्या पिढीला मात्र अभ्यास किंवा शिक्षण हे दडपण वाटतं. गेली काही वर्षे मी एक प्राचार्या म्हणून जेव्हा कधी कधी विद्यार्थ्यांना हाच प्रश्न विचारते तेव्हा त्यांच्या म्हणजेच, काही अति तल्लख बुद्धीची व चिकित्सक वृत्तीची मुलं वगळता, इतरांच्या चेहऱ्यावर गोंधळल्याचे अथवा अजाणतेचे भाव दिसतात. प्राचार्या म्हणून यासाठी की, जेव्हा मी स्वतः शिक्षक म्हणून विविध वर्गांत जायचे मी माझ्यासोबत उत्तुंग ऊर्जा घेऊन जायचे. ऊर्जा अभ्यासाची, अगदी भुकेल्यासारखे ज्ञान अर्जित करण्याची, अतिशय चपळतेने झटपट प्रश्न सोडवण्याची ते सुद्धा एक-दोन नाही तर अगदी दहा-बारा! अशा ऊर्जेच्या गुटीबरोबर वर्गात विनोद आणि हसू देखील भरभरून वाटल्या जायचे. आज एक प्राचार्या म्हणून जातानाही अर्थातच ऊर्जा घेऊन जातेच म्हणून, प्रश्नाचे उत्तर प्रथम 'नाही' असे जरी मिळाले तरी पुढच्या पायरीला चमकलेले डोळे व अजून नंतरच्या पायरीला उत्साही चेहरे व अलिखित वचनबद्धता त्यांच्या चमकदार डोळ्यांत निरोप देताना दिसतातच. पण, मुळात शिक्षण हा आनंदाचा सोहळा समजण्याचे भाव लोपताना दिसताहेत.

आजची पिढी जरी अधिक चपळ, उद्यमी व उत्साही असली तरी त्यांची चपळता व कार्यशीलता अभ्यास सोडून इतर बाबींमध्येच जास्त व्यक्त होते. म्हणून मग बरीच मुले परीक्षेच्या धाकाने उगीचच मनावर दडपण आणतात आणि त्या दडपणाखाली घुसमटत जगतात. याउलट, वर्षभर जर ते शाळेत जाणे, शिक्षकांच्या शिकवण्याचा आस्वाद घेणे, मित्रमैत्रिणी जमवणे, खेळणे, स्पर्धा करणे, किमान एका खेळात पारंगत होणे आणि दरम्यान सराव, उजळणी इत्यादींचा आनंद वाटून घेणे, लहान किंवा मोठी कुठलीही परीक्षा किंवा स्पर्धा होणार असेल तर,'अरे व्वा! आता मिळणार बुवा आपल्याला संधी आपल्या बुद्धीचे प्रदर्शन करण्याची, अन्यथा कुठे सगळ्यांना ठाऊक आहे आपण कशात किती निष्णात आहोत?' असे काही विस्मय काढणे. मग जमून तयारीला लागणे, सगळी बुद्धी व शक्ती एकवटून धमाल दाखवून देणे वगैरे केले तर नाही का, शिक्षण एखाद्या सोहळ्यासारखे वाटणार? यासाठी शिक्षकांच्या उत्साही स्वभावाची व सर्वसमावेशक अध्यापन पद्धतीची ठळक भूमिका असावी. प्रत्येक विद्यार्थ्याचे यश व आनंद हे आपले ध्येय आहे, अशी जाणीव व भरवसा मुलांच्या मनात त्यांच्या शिक्षकांनी रुजवायला हवे.

आमच्या संपूर्ण शिक्षणाच्या वेळी आम्हाला प्रत्येकच परीक्षा, अगदी सरप्राईज टेस्टसुद्धा एक उत्सवच वाटायची. सांगण्याचे तात्पर्य हे की, सर्व विषयात अव्वल असणे मुळीच महत्त्वाचे नाही. मात्र, सर्वच काही करण्याची आवड अव्वल असणे फार महत्त्वाचे! जसजसा नवीन ज्ञानाचा उलगडा होतो तसतशी आपल्याला आपल्या अज्ञानाची ओळख होते. ही ओळखसुद्धा एक विलक्षण आनंद देणारी असते व नवीन ज्ञान किती सुंदर आणि व्यक्तिमत्व खुलवणारे आहे. कसा करायचा हा शिक्षणाचा सोहळा...

१. एका वेळेस एक विषय हाती घेणे व घेतलेल्या पुस्तकात मन रमून जाईल इतका रस घेणे.
२. जे वाचतोय त्याचे आपल्या डोळ्यात चित्रीकरण करणे. चित्रीकरण असे की एक सिनेमा तयार होऊन डोळ्यांसमोर उभा होईल.
३. गुणानुक्रमांक नव्हे तर 'गुण' मिळवायचेत हे लक्षात ठेवणे.
४. 'बच्चा कामयाबी के पीछे नहीं काबिलियत के पीछे भाग, कामयाबी झक मार के तेरे पीछे आयेगी' हे धोरण ठेवणे.
५. हुशार विद्यार्थीच वर्गात बोलू शकतात हा गैरसमज आहे. 'हुशार'ची संकुचित, मर्यादित व्याख्या करणे ही एक अयोग्य, रुढीवादी परंपरा आहे. वर्गात आनंदाने सहभाग घेणे, जे समजले निदान त्यावर निःसंकोचपणे बोलणे हा सर्वांचा हक्क आहे, हे समजणे.
६. प्रत्येक विद्यार्थी हुशार असतो. फक्त हुशारी दडपलेली असते, हे एकमेव सत्य आहे, हे समजणे.
७. स्वप्नं असावी, निर्धार असावेत, गुणपत्रिका, शाबासकी, टाळ्या, प्रशंसा, सत्कार यांची हाव असावी.

उद्घोष उजळणीचा...

१. आता ह्या परीक्षेला जेवढे जमते तेवढे संपूर्ण शक्ती पणाला लावून सराव करणे;
२. सोप्याकडून हळुवार पण, सातत्याने कठीणाकडे जात गड जिंकण्याचा अनुभव घेत उजळणी करणे.
३. गणित व विज्ञानाच्या जुन्या वह्यांतील कागदे गोळा करून अथवा एकत्र शिवून घेऊन, १-२ वेळा पेन्सिलने व शेवटी एकदा पेनने भरपूर सराव करणे.
४. काहीही जड जात असल्यास आईवडीलांशी बोलावे, मन हलके करावे, मदत मागावी.
५. उरलेसुरले पुढच्या परीक्षेला किंवा परीक्षा झाल्यावरही करता येते हेही लक्षात ठेवणे. हा माथेफिरूपणा खरं तर आयुष्यात निपुणता मिळवून देणारा आहे. सुटले नाही, सोडायचे अजिबात नाही तर परीक्षा झाल्यावरही निवांतपणे वाचायचे.
६. निपुणता प्राप्त करण्यासाठी वेळेची मर्यादा नसते. जगावे बालपण, साजरे करावे शिक्षण, मिरवावे गुण! शेवटी एकदा,

पुरे झाला लपंडाव सुस्तीचा स्फूर्तीशी,
हे अर्णव ज्ञानाचे आज अलगद उमगले
झुंज एकदाची जिंकलेय मी माझ्यातल्या अजागळीशी
पुन्हा अथांग पाहून खोली पाय नाही डगमगले,
आज माझ्या पुस्तकांतच मला प्रयागराज सापडले.

आठवणींच्या पारावर

मो. बा. देशपांडे/८३२९१९३५४२

ऑनलाईन परब्रह्म!

हल्ली तीन प्रकारचे बॉय रस्त्यावर सुसाट वेगाने दिसतात. एक कुरियर बॉय आणि दुसरा ऑनलाईन वस्तू डिलिव्हरी बॉय, तिसरा पिझ्झा बॉय म्हणजे अन्नाची पाकिटे बाईकवर आणणारे ऑनलाईन परब्रम्हाचे वाटाडे ! वाढलेले केस, दाढीचे खुंट, काळपट शर्ट, विटकी जीन्स, पाठीवर लाल पेटारा आणि हातात मोबाईल अशा टिपिकल अवतारात हा प्राणी यांत्रिक धावपळ करीत असतो. अनेक बड्या हॉटेल्सच्या बाहेर या डिलिव्हरी बॉईजची फौज तैनात असते. या निमित्ताने युवावर्गाला रोजगार उपलब्ध झाला. हेही नसे थोडके !

उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म, या शास्त्रवाचनानुसार अन्नग्रहण ही निव्वळ पोट भरण्याची रांगडी क्रिया नसून तो एक संस्कारविधी आहे. त्याला यज्ञाची उपमा दिलेली आहे. असे हे अन्न कुठेतरी तयार होऊन, रस्त्यावरून प्रवास करीत तुमच्यापर्यंत पोहचेल अशी पूर्वसुरींनी कधी कल्पना तरी केली असेल काय? जेवताना शांतचित्ताने चर्वण करून जेवणे कुठे आणि हे रस्त्यावर मटामटा बोकणे भरणे कुठे? आताशा मेगा

बफे संक्रमणाचा सर्वत्र फैलाव झालाय. परिणामी गरीब वधूपित्याला ही या चढाओढीत भाग घेणे क्रमप्राप्त झाले आहे. बफेच्या निमित्ताने डाव्या हाताने वाढून घेऊन उभे राहून जेवणाची सवय अंगवळणी कधी पडली ते कळलंच नाही आणि आता तर खवय्यांच्या भेटी परब्रह्म रस्त्यावर आले गा...! असं म्हणण्याची वेळ आली. आमचे एक परिचित! त्यांचा एकुलता एक सुपुत्र अमेरिकेत मल्टी नॅशनल कंपनीत! मायबाप सत्तरीपार आहेत. ते पोराच्या भेटीसाठी तळमळत असतात. सारखे पोराला फोन लावतात. पोरगा म्हणतो,'शांत व्हा बघू ! मी तेथे येऊन काय करू? आज तुम्हाला मस्तपैकी पनीर टिक्का आणि तंदुरी ऑर्डर करतोय. छान खा आणि मजा करा!' हे सुपुत्र आईबाप राहतात तेथील जवळच्या हॉटेलमधील पदार्थ ऑनलाईन ऑर्डर करून पाठवतो. थोड्याच वेळात एक पोऱ्या पुरचुंडी हवाली करून निघून जातो. मुलाने इतक्या लांबून आमच्या पोटाची काळजी करतो, हे बघून या आईबाबांचा ऊर आनंदाने भरून येतो. सुपुत्राला आईबाबांप्रती सेवाधर्माचे पालन केल्याचं समाधान मिळतं. आणिक काय हवे?

धावत्या जीवनशैलीत जेवायलाच काय पाणी प्यायला फुरसत नाहीये. अशावेळी आयते गरम जेवण कुणीतरी आणून दिले तर, किती वेळेची बचत होते. असा एक युक्तिवाद आहे. अनेक आयटी कंपन्या तसेच खाजगी संस्थाने यांना कर्मचारी सतत कामावर तैनात हवे असतात. एक किस्सा आठवला. एका अति संवेदनशील ऑफिसात तेथील एक कर्मचारी सतत किबोर्डवर बोटे ठेवून असतो. लंचटाईम मध्येही त्याला कॉल येतातच कीबोर्ड ऑपरेट करावा लागतो. म्हणून, रोज त्याला बायको डब्यात सुकी भाजी करून देते. तर्री भाजीला पट्ठा नेहमीसाठी वंचित झालाय. हा कसला जॉब? ऑफिसात कॅन्टीन असते. तेथे खाऊन लगेच कामाला लागणे हा शिष्टाचार झालाय. परिवर्तन संसार का नियम है, हे मान्य केल्यावरही असली संस्कृती भक्षक तत्वे मनात स्थान मिळवत नाही.

तेव्हा विटामिन्स कोणाला माहित नव्हते, प्रथिने वगैरे शब्द वाचले केवळ शाळेच्या पुस्तकातच! न्यूट्रिशनल चार्ट ठाऊकच नव्हता. मिनरल्स, कोलेस्टरॉल, लिपिड प्रोफाइल, ट्रायग्लीसेराईड्स, सैचुरेटेड फॅट्स, लो कॅलोरी इंग्रेडीएन्ट्स आदी शब्दांची ओळख नव्हती. तेव्हा वेटलॉस आणि वेटगेन यातील फरक समजत नव्हता. भुकी तो सुखी या वचनात मोठा आशय दडलेला आहे. आता तर विविध प्रकारचे खाद्यपाऊच, शिवाय ओट्स, मखाने, चीज, पनीर, राजमा, गोडांबी, पीनट बटर, वेफर्स, कुरकुरे, मावा, मशरूम, बीटरूट, कलौंजी इत्यादी पदार्थ कधी पाहिलेही नव्हते. मोसमी फळ एक किंवा दोनदा घरी येत, त्यात कोण आनंद ! बारमाही आईस्क्रीम मिळत नव्हते. त्याचा फोटो दुकानाच्या पाटीवर नुसता बघितला तरी भारतीय संस्कृतीत अन्न हे परब्रह्म असून जेवण हासुद्धा एक संस्कार आहे. उदर भरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म! हे उदात्त नीतिनियम आहेत. जेवण म्हणजे जठरातील अग्नीला हवन करणे होय. म्हणून, जेवताना अधिक बोलू नये. मार्गक्रमण करताना खाऊ नये. जेवताना उठू नये वगैरे... या अनुषंगाने पूर्वीच्या त्या नेत्रदीपक पंगती आठवून आजही मन प्रमुदीत होते. पण, आता मोबाईल चिवचिव करतो, कधी डोअर बेल वाजते, कुणी घरी नेहमी भेटत नसेल तर, मुद्दाम भोजनाची वेळ साधून त्याला गाठावे लागते.

पूर्वी न्याहारी, घरी पाहुणे आले किंवा लग्नातही काही ठराविक पारंपरिक पदार्थ असत. ज्याचं नावीन्य कधीच ओसरत नसे. अगदी नवतरूणीसुद्धा तेच पारंपरिक पदार्थ शिकायच्या. आता जुन्या पिढ्यांसोबत तो दरवळ गेला. आता फास्ट फूड, जंक फूड आणि चायनीज फूड तेजीत आहे. शिवाय टीव्ही चॅनेल, युट्यूब आणि ऑनलाईन नवीन नावाची पदार्थ यांची रेलचेल आहे. प्रत्येकाने काहीतरी वेगळं करण्याची टूम आहे. नाश्तामधील साऊथ इंडियन आणि जेवणामध्ये पंजाबी डिशेसचा अग्रक्रम असतो. त्यांच्या नावांचा बोलबाला दिसतो आणि आपली समांतर नावे विस्मरणात गेली. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. आता केवळ उदरभरणं! त्याचा यज्ञकर्माशी काही संबंध उरलेला नाही. तात्पर्य, अन्नम परम भेषजम... अन्न हेच औषध समजा! नाहीतर औषध हेच अन्न समजावे लागेल, हे सूत्र अंतर्मुख करणारे आहे.

कडकडून भूक लागली असता लाकडाचा भुसा खाल्ला तरी त्याला चव येते. पण, आताशा मॅनमेड पॅकेड फूड, बेकरी आयटम्स, फास्ट फूड, स्टफ फूड आणि जंक फूडच्या जमान्यात पोटात एनिहाऊ ढकलणे महत्वाचे! सोबत आर्टिफिशियल कलर्स, पेस्टिसाइड्स, इमल्सिफायर्स, प्रिझर्वेटिव्हज...अबब काय हे! लहान मुलांनी चॉकलेट आणि अति शर्करायुक्त पदार्थ खाल्ल्याने दातांच्या समस्या तर होतातच पण, रक्तवाहिन्यांच्या काठीण्याची सुरुवात येथेच मूळ धरते. घरचे ताजे गरम जेवण मिळते तो भाग्यवान! अर्थात ही भूक नव्हे, ही एक वृत्ती आहे. फ्रिज या वृत्तीला खतपाणी देतो. काय करणार हो...हल्ली टाईम मॅनेजमेंट हा क्रायसिस टॉपिक आहे. एकाच वेळी अनेक कामांचे आदेश मेंदूला दिले जातात. पोटात अन्नाचे इंधन टाकणे आणि गाडीत पेट्रोल टाकणे या दोन्ही क्रिया फिल इट एंड फरगेट इट या श्रेणीत आल्या आहेत. बफे मध्ये उभ्याने किती काळ जेवणार? अनेक लोक सोयीची जागा निवडून तेथे प्लेट घेऊन बसतात. यापेक्षा ओळीने पंगतीचे दृश्य अधिक चांगले नव्हते का?

अल्पावधीत अधिकधिक कामाचा उरक! खायला फुरसत नाही. पाणी प्यायला सवड नाहीये. परिणामी माणूस एक वर्कोहोलिक मशीन झाल्यास नवल वाटू नये. नाश्ता जेवण करताना समोर टीव्ही नाहीतर मोबाईल किंवा दोन्ही...परिणामी जेवणाकडे लक्ष नसणे, किती खाऊन झाले याचे भान नसणे! घरीही तेच आणि ऑफिसमध्येही तेच! आणि यामुळे लहान मुलांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण वाढत चालले आहे. ज्यासाठी सारा आटापिटा ते जेवण जेवायलाच वेळ नाही का? परिणामी, चला मंडळी पाने मांडली आहेत. जेवायला चला... अशी हाळी पण ऐकू येत नाही.

'भोजनम सत्यशोधनम, प्रभाते मलदर्शनम' असं विनोबा म्हणत. आपण जेवण झाल्यावर हात धुतो, तोंड चूळ भरून धुतो. पण, पोटात गेलेलं व्यवस्थित पचलेय की नाही, याचा दर्पण पण बघायला नको का? आता उभ्याउभ्याने वीर बाजीराव पद्धतीने, मोबाईलचे कान आणि खांदा यात सँडविच करून कसेबसे ऑनलाईन परब्रम्ह मटकावून धूम ठोकायची ही शैली, कितपत योग्य? याचा साराचार विचार कोण आणि कधी करणार?

www.tarunbharat.net
तरुण भारत
मंगळवार, दि. २५ फेब्रुवारी

छोटे उस्ताद

तुम्हाला माहिती आहे का?

- अहमदनगरला साखर कारखान्यांचा जिल्हा म्हणतात.
- मराठी भाषेतील पहिला ग्रंथ विवेकसिंधू हा आहे.
- महाराष्ट्रात सोन्याच्या खाणी नाहीत.
- महाराष्ट्रातील घोलवडचे चिकू प्रसिद्ध आहेत.
- महाराष्ट्रात सर्वाधिक पाऊस आंबोली या गावी पडतो.

अशी पाखरे येती

निशिकांत मायी / ९८८११५२४३९

काळ्या पंखांचा पतंग

फाल्कन कुळातील शिकारी पक्षी केस्ट्रेल ज्याप्रमाणे घिरट्या घालण्याच्या सवयीसाठी ओळखला जातो, त्याच खुल्या गवताळ प्रदेशातील एक लहान शिकारी पक्षी म्हणून काळ्या पंखांचा पतंग नामक पक्षी ओळखला जातो. काळ्या पंखांचा पतंग एक विशिष्ट पक्षी आहे. लांबलचक पंख, पांढरा, राखाडी आणि काळा पिसारा आणि घुबडासारखे पुढे तोंड असलेले, लाल बुबुळांसह डोळे यामुळे त्याच्याकडे पाहताच भीती वाटते. ऑस्ट्रेलियातील निशाचर पक्ष्यांचे अक्षरपंख असलेल्या पतंगाचे वर्तनही घुबडासारखेच असल्याचे स्पष्ट दिसते. पतंग हा स्थलांतरित पक्षी नाही. त्यामुळे, उच्च उंचीच्या प्रदेशातील टेकड्यांच्या गवताळ उतारांवरच अधिक प्रमाणात दिसून येतात. काही भागात ते हिवाळ्यातील पाहुणे असल्याचे म्हटले जाते.

काळ्या पंखांच्या पतंगाचे वर्णन एलानस वंशातील चार प्रजातींपैकी एक असे निसर्गशास्त्रज्ञांनी केले आहे. पाय झाकणारे खूप लहान खवले हे एलानस वंशाचे वैशिष्ट्य असून त्याचेच प्रतिबिंब या काळ्या पतंगांमध्ये दिसून येते. हा पक्षी जेव्हा घिरट्या घालतो, तेव्हा दुय्यम थरांचा पांढरा खालचा भाग स्पष्ट दिसतो आणि बसल्यावर शेपटीच्या पलीकडे लांब बाजासारखे पंख पसरले असल्याचे दिसतात. काळ्या पंखांचा पतंग पक्ष्याची संख्या वाढतीच असून ती अधिक व्यापक झाली असल्याची नोंद करण्यात आली आहे. असे मानले जाते की, भूवापरातील बदल, शेती-कुरणांच्या जमिनीमुळे या प्रजातींना वाढीत मदत झाली आहे. काळ्या पंखांच्या पतंगाची आणखी एक प्रजाती असून ती पांढऱ्या शेपटीचा पतंग म्हणून ओळखली जाते. काळ्या पंखांचा पतंग वर्षभर घरटे बांधण्यात व्यस्त असतात. मादी नरांपेक्षा घरटे बांधण्यात जास्त मेहनत घेते. त्यांचा प्रजननाचा काळ अनिश्चित असून ते वर्षाच्या वेगवेगळ्या वेळी प्रजनन करतात. तीन किंवा चार अंडी घालते. दोघेही मिळून पिल्लांचे पालन करतात. काळ्या रंगांच्या पतंगांचे टोळ, छोटे-मोठे कीटक, सरडे, उंदीर हे आवडते खाद्य असून, जखमी पक्षी, लहान साप आणि बेडूकदेखील ते गट्टम करतात. क्वचित प्रसंगी ते उडतानाच शिकार करतात. मोठ्या पानांच्या झाडांवर ते एकत्र येतात. शिट्टीसारखा आवाज काढून ओरडतात. तथापि, काळ्या पंखांच्या पतंगांच्या मऊ पंखांमुळे ते बियाण्यांना चिकटून राहत असल्याने आणि बियाण्यांमुळे त्यांचे पंख अडकत असल्याने त्यांच्या जीविताला धोका निर्माण होतो.

काळ्या पंखांचा पतंग पक्ष्याची संख्या वाढतीच असून ती अधिक व्यापक झाली असल्याची नोंद करण्यात आली आहे. असे मानले जाते की, भूवापरातील बदल, शेती-कुरणांच्या जमिनीमुळे या प्रजातींना वाढीत मदत झाली आहे. काळ्या पंखांच्या पतंगाची आणखी एक प्रजाती असून ती पांढऱ्या शेपटीचा पतंग म्हणून ओळखली जाते.

Math puzzle

Solve the following question



Previous Math puzzle answer : 10

सु या आद्याक्षरापासून सुरु होणारे चार अक्षरी शब्द दिलेल्या संकेताच्या मदतीने शोधावयाचे आहे.

-: संकेत :-

१. चांगले वचन, उपदेशपर श्लोक
२. उत्तम गुणांची, सर्वगुणसंपन्न
३. नाटकाची माहिती करून देणारे मुख्य पात्र, सूत्रसंचालन करणारा
४. सुभ्यावरचा मुख्य अधिकारी
५. शृंगारलेले
६. अगदी, सर्वथा, किंवितही



(उत्तर पुढील अंकी)

मागील अंकातील शब्दचक्र पंचाक्षरीचे उत्तर –
1. जनानखाना 2. जवाबदारी 3. जलसमाधी 4. जलतरण 5. जकात नाका 6. जमीनदोस्त 7. जलतरंग 8. जनमेजय

वंडर गर्ल उन्नती नागपुरे

संजय पेंडसे/९४२२४४३२९५

बाल मित्रांनो, आरोग्यम् धनसंपदा! आपलं शरीर स्वस्थ असलं पाहिजे आणि मनही शुद्ध असलं पाहिजे पण, मन जर पापी असेल, दुष्ट विचारांनी भरलेलं असेल, त्याला कोणाचं बरं बघवत नसेल तर मात्र, प्रगतीमध्ये अडथळा येतो.

शरीर सुदृढ राहण्यासाठी त्याला कष्टसोबतच व्यायामाचीदेखील आवश्यकता आहे. आपली वंडर गर्ल उन्नती जगदीश नागपुरे जी फक्त सात वर्षांची धीट मुलगी आहे. या वयात अभ्यासाबरोबर स्केटिंग करते, वाचनाची तिला आवड आहे. मुख्य म्हणजे ती योगा प्रवीण आहे. याशिवाय, कुकींगचीही तिला आवड आहे. आईची या सगळ्यात तिला साथ आहे. स्केटिंग शिकवणारे शिक्षक राजू बिरोले हे मनापासून शिकवतात म्हणून ते उन्नतीला आवडतात. स्केटिंगसोबतच तिने योगाच्या दोन परीक्षा दिल्या आहेत. योगामध्ये तिच्यात चपळता असल्यामुळे तिला दोन स्पर्धांमध्ये सुवर्णपदक मिळवलं. आज सातव्या वर्षी तिच्याकडे किमान १५ ते २० बक्षीसं आहेत. श्री सत्य साई या शाळेची ती विद्यार्थिनी असून तिसऱ्या वर्गात ती शिकते. तिच्या मैत्रिणी माही, चित्रांशा आणि अनन्या या आहेत. उन्नती खोपोली, कर्नाटक, गोवा, पुणे आणि मुंबई अशा विविध ठिकाणी विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन, तिने शाळेचं नाव उज्वल केलं आहे. अशा, आजच्या आपल्या वंडर गर्लची तिने मनावर घेतलेल्या सर्व क्षेत्रात उन्नती यशस्वी व्हावी, यासाठी तरुण भारतचा छोटे उस्ताद तिला शुभेच्छा देतो.

उन्नती अभ्यासाबरोबर स्केटिंग करते, वाचनाची तिला आवड आहे. मुख्य म्हणजे ती योगा प्रवीण आहे. याशिवाय, कुकींगचीही तिला आवड आहे. स्केटिंग शिकवणारे शिक्षक राजू बिरोले हे मनापासून शिकवतात म्हणून ते उन्नतीला आवडतात.

संघ हीच जीवनगाथा!

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यावर्षी आपले शताब्दी वर्ष साजरे करीत आहे. यानिमित्त, 'संघ हिच जीवनगाथा' या मालिकेत अलक अर्थात अति लघुकथा सादर करीत आहोत. रा.स्व.संघाचे संस्थापक व सरसंघचालक आहेत परमपूजनीय डॉ. केशव बळीराम हेडगेवार! डॉ. हेडगेवार म्हणजे उदंड कीर्तीचे समर्पित जीवन! त्यांच्यानंतरचे सारेच वारस समर्पित जीवनाच्या आदर्शाचे आणि सन्माननीय व्यक्तिमत्वाचे मानकरी! त्यांची आठवण करू या.

१. सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार (१९२५ ते १९३०, १९३१ ते १९४०)
२. श्री. लक्ष्मण वामन परांजपे (१९३० ते १९३१)
३. श्री. माधव सदाशिव गोळवलकर (१९४० ते १९७३)
४. श्री. मधुकर दत्तात्रय देवरस (१९७३ ते १९९३)
५. श्री. राजेंद्र सिंग (१९९३ ते २०००)
६. श्री. के. एस. सुदर्शन (२००० ते २००९)
७. डॉ. मोहन मधुकर भागवत (२००९ ते विद्यमान)

प्रश्नसंच - २

तरुण भारतचा अभिनव उपक्रम

ज्ञानांजली!

संतश्रेष्ठ गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू करीत आहोत. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारीत दहा प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखीत स्वरुपात दै.तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. ब्रह्माण्डनायक सद्गुरुंच्या प्रगटदिनाचं औचित्य साधून, आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा.

१) यादव सुभेदाराला किती हजारांचा तोटा झाला होता ?
अ) आठ हजार ब) दहा हजार क) बारा हजार ड) चौदा हजार

२) महाराजांच्या समाधीपुढे कोणी यज्ञ केला होता ?
अ) चापडगावीचा वामन ब) लाडेगावचा गंगाराम
क) पळसखेडचा सुखदेव ड) शेगावचा मार्तंड

३) मृत्यूचे तीन प्रकार कोणी सांगितले आहेत?
अ) गजानन महाराज ब) नरसिंगजी महाराज
क) दासगणू महाराज ड) भास्कर महाराज

४) जानराव देशमुखांना मृत्यू कोणत्या प्रकारचा आला होता ?
अ) गंडांतर ब) आकस्मिक क) अपघाती ड) भौतिक

५) किसनलाल हा कोणाचा मुलगा होता ?
अ) गोदुलाल ब) बंकटलाल क) मदनलाल ड) मोतीलाल

६) राजाराम कंवर कोणता व्यवसाय करीत होते ?
अ) वकिली ब) वाण्याचा क) डॉक्टरकी ड) सराफाचा

७) खंडू पाटीलाच्या पत्नीचे नाव काय होते?
अ) जानकीबाई ब)गंगाबाई क) लक्ष्मीबाई ड) चंद्राबाई

८) पूर्वीचे शेगावचे नाव काय होते ?
अ) शिवगाव ब) शिवग्राम क) शिवालय ड) शिववाडी

९) अंजनीने पुत्रप्राप्तीसाठी कोणाची प्रार्थना केली ?
अ) रामाची ब) त्रिपुरारीची क) कृष्णाची ड) विठ्ठलाची

१०) कोंडोलीचा आम्रवृक्ष कोणाचा होता ?
अ) मारूती पाटील ब) खंडू पाटील क) देशमुख
ड) बळीराम पाटील

तरुण भारत आकांक्षाच्या ज्ञानांजली या उपक्रमात आपण सर्वांनी दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल आभारी आहोत. ज्ञानांजली प्रश्न मालिकेच्या पहिल्या भागात एकूण ७५० जणांनी उत्तरे दिलीत. त्यापैकी ५४ जणांनी पैकीच्या पैकी गुण प्राप्त केलेत. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

१)	प्रीती तोष्णीवाल	१९)	अथर्व जोशी	३७)	अशोक जोशी		
२)	अतुल देवगडे	२०)	वीणा बिडवई	३८)	अमेय बोबडे		
३)	वसुधा कोरान्ने	२१)	रश्मी भालेराव	३९)	अमित नागपूरे		
४)	शर्वरी परब	२२)	अनंत पाठक	४०)	शुभांगी गडकर		
५)	भाग्यश्री शर्मा	२३)	निधी गोळवलकर	४१)	सुचेता जोशी		
६)	शकुंतला ढुमणे	२४)	मनोज जोशी	४२)	नीला धनोडकर		
७)	विजयमाला देशमुख	२५)	अनघा आवदे	४३)	सुधाकर फिरके		
८)	मीना खेडेकर	२६)	शोभा राऊत	४४)	रेखा महाजन		
९)	सोहम जोशी	२७)	संजय पिटकर	४५)	मुंबई पवार		
१०)	स्वाती मुळे	२८)	प्रतिभा बुरकुले	४६)	ऋतुजा गोडबोले		
११)	पुष्पा खेडेकर	२९)	श्रीलेखा देवरस	४७)	लता सधाले		
१२)	अतुल चोरघडे	३०)	आरती देशपांडे	४८)	शुभांगी पांडे		
१३)	तृप्ती कुळकर्णी	३१)	वेदश्री लिमये	४९)	मेघना अभ्यंकर		
१४)	शुभांगी सुर्यवंशी	३२)	वृंदा तागडपल्लीवार	५०)	सुरेखा कोगजे		
१५)	रवींद्र टोगळे	३३)	मंजुषा साठे	५१)	अपर्णा देशपांडे		
१६)	मधुरा काशीकर	३४)	शीतल भट	५२)	अश्विनी दिघे		
१७)	अपेक्षा गोसावी	३५)	सुरेखा जोशी	५३)	ओंकार गावडे		
१८)	उज्वला फिरले	३६)	शुभांगी जोशी	५४)	प्रगती किडे		

मागच्या ज्ञानांजलीतील प्रश्नावलीची उत्तरे!

१) षड्विकार
२) सुकलाल व बाळकृष्ण
३) साधुपुरूष
४) योगमार्ग
५) तात्या
६) महंत गोपाळदास
७) श्रीमन्नारायण नारायण
८) चंद्राबाई
९) दामोदरपंत व बंकटलाल
१०) शंकराचार्य

सगळ्या विजेत्यांचे श्रीगजानन महाराज अध्ययन समूह नागपूर व तरुण भारत यांच्यातर्फे मनःपूर्वक अभिनंदन!

बंटीची बंडखोरी

(भाग ४२)

प्रीती वडनेरकर /९८२३९९४७९२

'बंटी, प्रॅक्टिकल कसं झालं?' यशनं विचारलं. 'द बेस्ट, एकदम सोप्पी! सेंट परसेंट मार्क्स मिळणार. दोस्तांनो, तुमची कशी झाली?' बंटीनं प्रतिप्रश्न केला.

'सोप्पी, अगदी सोप्पी! बंटी, खरं तर आपण थिअरीवर जास्त फोकस केलं होतं. प्रॅक्टिकलकडे जास्त लक्ष दिलं नव्हतं. पण, काहीच अवघड वाटलं नाही. सगळ्यांनाच फुल मार्क्स मिळतील,' शिरीषनं उत्तर दिलं. स्वानंद, युग, नंदू, चंदू यशनेही माना डोलावल्या. 'बंटी, फेब्रुवारी महिना सुरू झाला आणि हवेत किती बदल झाला नं? थंडी पळाली आणि गरम वारे सुरू झाले. रात्री पंखे लावायला लागतात हल्ली,' यश म्हणाला.'हो रे यश, बरी आठवण करून दिलीस. उन्हाळ्याला सुरूवात झाली. हे जरी खरं असलं, तरी एकदम गार पाणी प्यायला, आईस्क्रीम खायला सुरूवात करू नका. तसं केलंत तर, घसा धरेल तुमचा! सर्दी, खोकला, तापाला निमंत्रण होईल. औषधं घ्यावी लागतील, विकनेस येईल. ऐन परीक्षेमध्ये, तब्येत खराब होईल,' बंटीनं सूचना केल्या.

'बरं झालं बंटी, नाहीतर मी कालच आईला आठवण करून दिली की, पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, फ्रीजमध्ये ठेवायला सुरूवात कर म्हणून! आता कोमट पाणी पिववत नाही. पण आईनं बजावलं, परीक्षा झाल्याशिवाय नाही म्हणून,' शिरीष म्हणाला.

'आता दिवससुद्धा हळूहळू मोठा व्हायला सुरूवात झाली. पूर्वी संध्याकाळी पाच साडेपाचलाच अंधार पडायचा. हळूहळू अंधार पडायची वेळही पुढे सरकते आहे. सूर्याच्या उत्तरायणामुळे हे होतंय,' बंटी म्हणाला.

'बंटी थिअरीचे पेपर्सही सुरू झाले आहेत. एक पेपर झालासुद्धा! पण, खरं सांगू आज पेपर बघितल्यावर एकदम टेन्शन आलं मला! अचानक डोळ्यांसमोर अंधारी आली. क्वेश्चन पेपरवरची अक्षरंच दिसेनात. मला वाटलं झालं आता! मला पेपर लिहिताच येणार नाही,' शिरीष सांगत होता. सगळ्यांची काळजी ताणली गेली.

'मग?' बंटीनं विचारलं.'मी शांत बसलो थोडावेळ! डोळे मिटले आणि मारूती स्तोत्राच्या दोन ओळी मनात म्हटल्या. सुपरवायझरकडे पाणी मागितलं. पाणी प्यायल्यावर कुठे नॉर्मल वाटलं. मग संपूर्ण क्वेश्चन पेपर शांतपणे वाचला. सोप्पा वाटला. मग झरझर लिहायला सुरूवात केली. चार सप्लीमेंटस् लागल्या. वेळेत लिहून पूर्ण केला पेपर,' शिरीषनं सांगितलं.

'माझी तर गंमतच झाली. आपली पेपरची वेळ म्हणजे रोजची आपली छोटीशी डुलकी काढायची वेळ! पेपर सोडवायला घेतला आणि माझ्या डोळ्यांवर पेंग आली. आपोआप डोळे मिटले. मी बेंचवर डोकं टेकवून चक्क झोपलो,' स्वानंदने सांगायला सुरूवात केली.

'बापरे...मग?' यशनं विचारलं. सुपरवाझरचं माझ्याकडे लक्ष गेलं. ग्लासमध्ये पाणी घेऊन, त्या माझ्याजवळ आल्या. त्यांनी मला उठवलं. 'हे घे... तोंडावरून पाण्याचा हात फिरव. झोप जाईल,' त्यांनी माझ्या हातात पाण्याचा ग्लास दिला. मी त्यात बोटं बुडवली आणि चेहऱ्यावरून गार पाण्याचा हात फिरवला. सगळी मरगळ गेली. एकदम फ्रेश वाटलं मग, पटापट लिहायला सुरूवात केली.'

'माझ्या तर घषाला एकदम कोरडच पडली, पेपर बघून! सुपरवायझर पेपर वाटत होते. इकडे मला धीर धरवत नव्हता. कोरड पडल्यावर अचानक कोरडी ढास लागली. शेवटी सुपरवायझरचं लक्ष गेलं. त्यांनी पाण्याची बाटली दिली. तहान इतकी लागली होती की, घटाघटा पाणी प्याल्यावर अख्खी बाटली रिकामी झाली. तेव्हा कुठे शांत वाटलं. मग पेपर वाचायला सुरूवात केली. एकदा लिहायला लागल्यावर मग काही नाही. फटाफट फटाफट लिहिला, संपवला,' यशनं सांगितलं.'मला काही विचित्र वगैरे वाटलं नाही. बोर्डाची परीक्षा असली तरी, शाळेसारखीच वाटली. आजूबाजूला, मागे पुढे वेगवेगळी मुलं बसली होती, एवढंच! मी, मला असं भासूच दिलं नाही की, ही काही वेगळी, महत्वाची परीक्षा आहे, असं! त्यामुळे शांतपणे पेपर वाचला आणि डोकं शांत ठेवून लिहिला,'बंटीनं सांगितलं.

'चला आता उद्या सुट्टी आहे. एकदम परवा पेपर आहे. मग परत दोन दिवस सुट्टी! अशा सुट्याच जास्त आहेत.' 'आई-बाबा, आमच्या ग्रुपमधल्या प्रत्येकालाच पहिल्या पेपरच्या वेळी काही ना काही त्रास झाला. जो पूर्वी कधीच झाला नव्हता. नशीब... लगेच त्यांनी त्याच्यावर मात केली आणि पेपर सोडविला,' बंटीन जेवणाच्या वेळी सांगितलं. 'अरे काय होतं, बोर्डाची परीक्षा! त्यामुळे वेगवेगळी सेंटर्स, वेगवेगळे परीक्षा हॉल! वर्गात वेगवेगळे चेहरे! साऱ्यांचा परिणाम, मनावर होऊन त्याचा परिणाम काहीतरी वेगळाच होऊन जातो. मग नेहमीपेक्षा वेगळंच वाटायला लागतं,' आई म्हणाली.

'या असल्या प्रॉब्लेमवर, तुझ्या आईकडे चांगला उपाय आहे. विचार तिला! अर्थात तुला त्याची गरज पडली नाही, ही गोष्ट वेगळी,' बाबांनी सांगितलं.

'आई, कधी सांगितलं नाहीस मला ते! म्हणजे तुला माहीत आहे की, बहुतेक जणांना असा त्रास होतो म्हणून?' बंटीनं विचारलं.'बंटी, खरं तर तुझ्या ग्रुपचा चांगला अभ्यास झाला आहे. म्हणून मला वाटलं नव्हतं की, कोणाला असा त्रास होईल म्हणून! आमच्या कॉलेजमधल्या बऱ्याच मुलींना असा त्रास होतो. आम्ही, परीक्षेच्या आधी, त्यांना स्पेशल ट्रेनिंग देतो. त्यामुळे, परीक्षेच्या वेळी त्यांचं मन शांत असतं,' आईनं सांगितलं.

'हो, पण स्पेशल ट्रेनिंग कसलं?' बंटीनं विचारलं. 'ज्यादिवशी पेपर असेल, त्यादिवशी सकाळी काही योग करायचा,' आईला मध्येच थांबवत बंटीनं विचारलं,'म्हणजे आसनं करायची?''आसनं नाही रे बाळा, प्राणायाम! कपालभाती, भसरिका, अनुलोम विलोम, दीर्घ श्वसन...असे श्वासाचे प्रकार,' आई म्हणाली.'अगं...पण परीक्षेच्या दिवशी, रिव्हिजनची गरज असते. जेवढी रिव्हिजन होईल, तेवढी हवी असते. अवघड प्रश्नांचे मॉडेल आन्सर्स बघायची घाई असते. अशा वेळी खरं तर जेवायची, खायचीसुद्धा इच्छा नसते आणि तू म्हणतेस प्राणायाम करायचा? म्हणजे किती वेळ जाईल त्याच्यात?' बंटीनं विचारलं.

'फक्त दहा मिनिटं लागतात त्याला! पण, त्यामुळे मन प्रसन्न राहतं, टवटवीत राहतं, शांत वाटतं. शेवटी बऱ्याच गोष्टी मनाच्या स्थितीवर अवलंबून असतात. प्रत्यक्षात त्रास होत नसला तरी, परीक्षेचं दडपण येतं आणि मानसिक आजार, जे तात्पुरते असतात, ते यामुळे जातात,' आईनं सागितलं.'बंटी, मला वाटतं तू तुझ्या ग्रुपला घेऊन ये आपल्या घरी! आज रविवार आहे नं, सुट्टीच आहे. सांग सगळ्यांना!' बाबांनी सुचवलं. शिरीष, स्वानंद, यश, युग, नंदू, चंदू सारे जमले.

बंटीनं साऱ्यांना बसायला आसनं दिली. बंटीसकट सगळे मांडी घालून बसले.

'दररोज, फक्त दहा मिनिटं यासाठी राखीव ठेवायची. चला, माझ्या पाठोपाठ तुम्ही करा,' आईनं प्रथम अनुलोमविलोम, त्यानंतर भसरिका, कपाल भाती, दीर्घ श्वसन करून दाखवलं. सर्वांनी अनुकरण केलं.'

'कसं वाटतंय?' आईनं विचारलं. 'खूप फ्रेश वाटतंय काकू!' 'एकदम उत्साह वाढल्यासारखं वाटतंय.' 'किती सोप्पं आहे सगळं!' प्रत्येकानं आपआपलं मत प्रदर्शित केलं. 'वाटतंय नं? मग प्रॉमिस करा, दररोज हे करायचं. परीक्षा असो किंवा नसो. आयुष्यभर तुम्हाला उपयोग होईल याचा! आलाच आहात तर गाजर हलवा खाऊन जा. उद्या पेपर आहे ना? मग अभ्यास करा. ऑल द बेस्ट!'

दररोज प्राणायाम करायची सवय बंटी आणि त्याच्या ग्रुपला लागली. तशीही कोणालाच परीक्षेची भीती वाटतच नव्हती पण, उरले सुरले मानसिक दडपणही निघून गेले.

क्रमशः

परीक्षेला जाताना...

दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा आता सुरू झाल्या आहेत. विद्यार्थी आणि पालकांनी काही टिप्स लक्षात ठेवल्या तर परीक्षेची प्रक्रीया सोपी होईल. परीक्षा जवळ आली की, विद्यार्थ्यांना अभ्यासाची काळजी वाटू लागते. पण, याच वेळी शांत राहून तयारी करणंही आवश्यक आहे. परीक्षेला जाण्यापूर्वी योग्य आणि पचनास हलका आहार घ्यावा. परीक्षेला उपाशीपोटी जाऊ नये.

परीक्षा सुरू होण्यापूर्वी एक तास आधीच परीक्षा केंद्रावर पोहचण्याची तयारी ठेवावी. ऐनवेळी परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी बस न मिळणे, प्रवासात अडथळा निर्माण होणे या गोष्टी होऊ शकतात. हे टाळून हाती वेळ ठेवून जाणे श्रेयस्कर! कोणतीही परीक्षा अंतिम नाही. त्यामुळे, ताण न घेता पेपरला जावे.

तुमची परीक्षा अगदी जवळ आली असताना, तुम्ही तयार केलेल्या नोट्स वाचा. त्या मुद्देसूद असल्याने मनातील अभ्यासाची भीती नाहीशी होईल. एखादा प्रश्न जर आपल्याला समजला नाही, तर आपण लगेच त्या प्रश्नाचे उत्तर गूगल करतो. पण परीक्षा देण्यापूर्वी मोबाईल वापरल्यास निरर्थक नोटिफिकेशन्समुळे आपले लक्ष विचलित होते. परीक्षेपूर्वी मोबाईलपासून दूर राहणे फायद्याचे आहे.

काय होईल? मला कमी मार्क्स मिळतील का?आईबाबा काय म्हणतील? वगैरे विचार मनात येतात. पण, त्याकडे दुर्लक्ष करून अभ्यासावर लक्ष केंद्रीत करा. तुम्ही असे लोक पहाल ज्यांनी कोणत्याही स्रोताशिवाय अभ्यास केला आणि यशस्वी व्यक्ती बनल्या.

काय होईल? मला कमी मार्क्स मिळतील का?आईबाबा काय म्हणतील? वगैरे विचार मनात येतात. पण, त्याकडे दुर्लक्ष करून अभ्यासावर लक्ष केंद्रीत करा. तुम्ही असे लोक पहाल ज्यांनी कोणत्याही स्रोताशिवाय अभ्यास केला आणि यशस्वी व्यक्ती बनल्या, गरिबीतही हिंमत हारली नाही. परीक्षेला सामोरे जाताना स्वतःला प्रेरित ठेवणे आवश्यक आहे. परीक्षेसाठी लागणारे सर्व साहित्य वेळेवर आपल्या बॅगमध्ये भरून ठेवा. तुम्ही प्रवेशपत्र काळजीपूर्वक सोबत ठेवा. पेपरमध्ये आलेले अवघड प्रश्न सुरवातीला घेऊ नयेत. जे प्रश्न आपणास सोपे वाटतात ते सुरुवातीला घ्या. एखादा अवघड प्रश्न सुरुवातीला जर घेतला तर तो व्यवस्थित न सोडवल्यामुळे आपल्या मनामध्ये भीती निर्माण होईल आणि त्याचा परिणाम इतर प्रश्नांवरही होईल. म्हणून सुरुवातीला सोपे प्रश्न सोडवावेत. या सोप्या टिप्सचा वापर करून, परीक्षा छान द्या आणि यश मिळवा. तरुण भारत आकांक्षा परिवाराकडून तुम्हाला खूप शुभेच्छा!

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

संत निरंकारी मंडळाकडून नर्सीतील कयाधू नदीपात्रात स्वच्छता मोहीम

१२० सेवादलांनी नदीपात्रातील १० ट्रॅक्टर कचरा उचलला

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २४ फेब्रुवारी
तालुक्यातील संत नामदेव महाराज यांचे जन्मस्थळ असलेल्या नर्सी नामदेव येथे संत निरंकारी मंडळाच्यावतीने रविवारी सकाळी आठ ते दुपारी बारा यावेळेत स्वच्छ जल स्वच्छ मन हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात १२० सेवादलांनी सहभाग नोंदवत कयाधू नदीपात्रातील तब्बल १० ट्रॅक्टर कचरा उचलून नदीचे पात्र स्वच्छ केले. या उपक्रमाचे गावकऱ्यांनी कौतुक केले आहे.

संत निरंकारी मंडळाकडून माता सुदीक्षाजी यांच्या मार्गदर्शनाखाली मागील दोन वर्षापासून कयाधू नदीच्या पात्रात स्वच्छता अभियान राबविले जाते. संत नामदेव महाराजांचे जन्मस्थळ असलेल्या नर्सी नामदेव येथे हे अभियान राबविण्यात आले. या अभियानात हिंगोलीसह आखाडा बाळापूर, औंढा नागनाथ, गोरेगाव, माळहिवरा या परिसरातील महिला, पुरूष असे १२० सेवादल सकाळीच नर्सीत दाखल झाले होते. या अभियानात लहान मुलांनीही सहभाग घेतला होता.

सकाळी आठ वाजता सामुहीक प्रार्थनेनंतर प्रत्यक्षात स्वच्छतेला सुरूवात करण्यात आली. महिला व पुरूषांनी हाती झाडू घेत कयाधु नदी घाटाच्या पायऱ्या स्वच्छ केल्या. त्यानंतर नदीपात्रात असलेला कचराही उचलून घेतला. यामध्ये प्रामुख्याने कपडे, पाण्याच्या बॉटल, साड्या, कागद, मेनकापड यासह इतर कचरा एकत्र गोळा करून त्यानंतर ट्रॅक्टरद्वारे वाहतुक करून इतर ठिकाणी टाकून देण्यात आला.

संत निरंकारी मंडळाने अवघ्या चार तासातच कयाधू नदीच्या घाटाचा परिसर चकाचक केला. मंडळाच्या उपक्रमाचे गावकऱ्यांनी कौतुक केले. या उपक्रमात संत निरंकारी मंडळाचे कन्हैयालाल नैनवाणी, लालचंद नैनवाणी, सुधाकर वाघमारे, प्रा गजानन कुटे, गोपाल इंगळे, विलास नवले, सुर्यकांत गव्हाणे, राजू लोखंडे, राजु आठवले, ज्ञानेश्वर आघाव, पंढरीनाथ आघाव, संजय जाधव यांच्यासह सेवादलाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराजांबद्दल आक्षेपार्ह विधानाबद्दल निषेध

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवारांनी जाहीर माफी मागावी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २४ फेब्रुवारी
जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांचा एकेरी उल्लेख करून त्यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याच्या निषेधार्थ येथील स्वरूप संप्रदायाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करीत काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी जाहीर माफी मागावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज हे धर्मगुरू असून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी महाराजांबद्दल एकेरी भाषा वापरून आक्षेपार्ह विधान केल्यामुळे संपूर्ण संप्रदायातील लोकांच्या भावना दुखावल्या आहेत. त्यांच्या विधानाचा स्वरूप संप्रदायाच्यावतीने जाहीर निषेध करीत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विजय वडेट्टीवार यांच्या प्रतिकात्मक फोटोला जोडे मारीत त्यांच्या भक्तांनी जाहीर निषेध केला. वडेट्टीवार यांनी जाहीर माफी मागावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी स्वरूप संप्रदायाच्यावतीने देण्यात आला आहे. यावेळी विजय वडेट्टीवार यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करीत भक्तांनी तीव्र प्रतिक्रीया दिल्या.

यावेळी जिल्हाध्यख संतोष चव्हाण, गंगाधर देवकते, सखाराम चोंढीकर, राधाकिशन नारायण, गोविंद गव्हाणकर, मसाराव शिंदे, सदाशिव लाड, अविनाश देशमुख, विठ्ठलराव चोंढीकर, संतोष वानखेडे, निर्मलाबाई मोरे, सुजाणबाई नाईक, राधा माळी, गजाबाई बर्गे, सखुबाई ठोंबरे, नंदा गीते, रंजना गीते, विलाबाई डवले, राधाबाई लुटे, मुक्ता वानखेडे, रेखा चव्हाण आदींची उपस्थिती होती.

मिरवणुकीत धक्का लागल्याच्या कारणावरून दोघांना बेदम मारहाण

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २४ फेब्रुवारी
कळमनुरी तालुक्यातील धानोरा जहाँगीर येथे शिवजयंती मिरवणुकीत धक्का लागण्याच्या कारणावरून दोन तरूणांना लोखंडी रॉडने मारहाण करून गंभीर जखमी केले असून याप्रकरणी पोलिस ठाण्यात आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, दि २३ फेब्रुवारी रोजी धानोरा जहाँगीर येथे शिवजयंतीची मिरवणुक काढण्यात आली होती. या मिरवणुकीत प्रवीण पाईकराव याचा प्रणव हरण यास धक्का लागला. शिवजयंती मिरवणुक संपल्यानंतर धक्का लागण्याच्या कारणावरून प्रणव हरण याने सुनील पाईकराव यांचे घरासमोर येवून हातमध्ये लोखंडी रॉड घेवून प्रवीण याच्य डोक्यात, पाठीवर वार करून जखमी केले. यावेळी गावातील नागसेन डोंगरे याला सुध्दा डोक्यामध्ये रॉडने मारून गंभीर जखमी केले. त्यानंतर प्रणव याचे वडील माधव हरण यांनी जातीवाचक शिवीगाळ केली.

या मिरवणुकीत कळमनुरी येथील आलेल्या एकाने नागसेन याच्या डोक्यात दगड मारून जखमी केले. या मारहाणीत कळमनुरी येथील ८ ते १० जणांचा समावेश होता असे तक्रारीत नमुद करण्यात आले आहे. त्यांनी प्रवीण आणि नागसेन यांना लाथाबुक्यांनी मारून जखमी केले. यावेळी तेथे उपस्थित बंटी डोंगरे व सोंनु चापनर हे उपस्थित होते. जखमी दोन्ही तरूणांना बंटी डोंगरे व रोहन पाईकरव यांनी मोटारसायकलवर उपजिल्हा रूग्णालय कळमनुरी येथे उपचारासाठी दाखल केले. कळमनुरी येथे प्राथमिक उपचारानंतर दोन्ही जखमी तरूणांना नांदेड येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे. याप्रकरणी प्रफुल्ला पाईकराव यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणी चारजणांना पोलिसांनी अटक केले आहे.

हिंगोली– राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरदचंद्र पवार हे आज हिंगोली जिल्हा दौऱ्यावर येणार असून नर्सी नामदेव येथे संत नामदेव महाराज संस्थानला भेट देणार आहेत. त्यानंतर हिंगोली येथे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक माणिकराव टाकळगव्हाणकर यांच्या शताब्दी वर्षानिमित्त शरदचंद्र पवार यांच्याहस्ते त्यांचा सत्कार होणार आहे. तसेच हॉटेल शांतीचे उद्घाटनही शरदचंद्र पवार यांचेहस्ते होणार आहे. या कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली असून भव्य सभामंडप उभारण्यात आला आहे. तयारीची पाहणी करतांना जिल्हाध्यख दिलीप चव्हाण आदी. छाया– सुनील पाठक

संक्षिप्त वृत्त

महाशिवरात्री उत्सवाला ध्वजपूजनाने सुरूवात

हिंगोली– औंढा नागनाथ येथील आठवे ज्योतिर्लिंग श्री नागनाथ मंदिरात महाशिवरात्र उत्सवानिमित सोमवारी ता. २४ सकाळी उत्सवाला ध्वज पुजनाने सुरुवात करण्यात आली.नागनाथ संस्थांचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे यांनी ध्वजपूजन केले. यावेळी नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव, देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, पूरोहित कृष्णा ऋषी,मुख्यपुजारी श्रीपाद भोपी, शेखर भोपी, दत्त मठाचे उत्तराधिकारी राजेश गिरीजी महाराज,तलाठी गजानन गुंजकर, गार्ड प्रमुख बबन सोनुने, राम प्रसाद उदगिरे, मुकेश पडोळे, जगदीश दिंडे, नितीश कुलकर्णी गजानन उदगीरे, कृष्णा पाटील, संजय मोरे, देवा देशमुख, दत्तात्रय शेगुकर, प्रशांत स्वामी, पंडितराव देशमुख यांच्या उपस्थितीमध्ये महाशिवरात्री उत्सवाला सुरूवात करण्यात आली. २५ फेब्रुवारी रोज मंगळवारी रात्री दोन वाजल्यापासून सर्व शिवभक्तांसाठी शासकीय पूजा झाल्यानंतर मंदिर दर्शनासाठी उघडण्यात येईल. महाशिवरात्रीच्या दिवशी बुधवारी (ता.२६) संध्याकाळी सात वाजता श्री नागनाथ देवाची पालखी मिरवणूक होणार आहे. १ मार्चला शनिवारी रात्री दहा वाजता रथोत्सव होणार आहे. असा हा भरगच्च कार्यक्रम महाशिवरात्री उत्सवानिमित्त होणार आहे.

राज्य उत्पादन शुल्काची कारवाई

हिंगोली– राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विविध पथकांनी हिंगोली, वसमत, कळमनुरी परिसरात अवैध मद्य विक्री, वाहतुक तसेच हातभट्टी दारू विक्री विरोधात छापे टाकले. यावेळी ७ आरोपींकडून देशी दारूच्या २३६ बाटल्या, १० लिटर हातभट्टी दारू, १०० लिटर रसायन, १५ लिटर ताडी असा एकूण २२ हजार ५३५ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई अधीक्षक आदीत्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक मोहन मातकर, टी बी शेख, कृष्णकांत पुरी, प्रदीप गोणारकर, ज्योती गुट्ठे, कांबळे, आडे, राठोड आदींनी केली आहे.

जिल्हा व सत्र न्यायालयाच्या संरक्षण भिंतीजवळ अतिक्रमण

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २४ फेब्रुवारी
येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीचे दोन दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले होते.

न्यायालयाच्या संरक्षण भिंतीजवळ अतिक्रमण करणाऱ्यांमध्ये चढोओढ लागली असून अनेकांनी येथे दोऱ्या बांधून आपली जागादेखील राखून ठेवल्याचे दिसत आहे.

न्यायालयाची जूनी इमारत ही पंचायत समितीच्या बाजुला होती. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात नोटरी, बाँड विक्रेते तसेच झेरॉक्स आदीं दुकाने होती. न्यायालयामुळे या दुकानदारांची दुकाने चांगली चालत होती परंतु आता पोलिस मुख्यालयाच्या बाजूला जिल्हा व सत्र न्यायालयाची नवीन इमारत झाली असून सोमवारपासून या इमारतीमध्ये आता न्यायालयीन कामकाज सुरू झाले आहे. त्यामुळे आता जुन्या न्यायालय परिसरातील नोटरी, झेरॉक्स, बाँड विक्रेते आदी दुकानदारांचे व्यवसाय धोक्यात येणार आहेत. त्यामुळे या व्यावसायिकांनी आता नवीन इमारतीच्या संरक्षण भिंतीजवळच अतिक्रमणे करण्यास सुरूवात केली आहे. या जागेत अनेकांनी खोके आणून ठेवली आहेत तर काहीजणांनी या ठिकाणी दोऱ्या बांधून जागेवर अतिक्रमण करण्यास सुरूवात केली आहे. या रस्यावर आता अतिक्रमणांमुळे वाहतुकीची कोंडी होणार आहे.

लग्नाचे आमिष दाखवून तरूणीवर बलात्कार, गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २४ फेब्रुवारी
छत्तीसगड येथील १९ वर्षीय तरूणी कामानिमित्त कुटुंबासह शिरडशहापूर येथे आली असता तिला लग्नाचे आमिष दाखवून राहत्या घरी तसेच लॉजवर नेऊन तिच्यावर बलात्कार केल्याप्रकरणी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. परंतु या गुन्ह्याप्रकरणी कमालीची गुप्तता काही पोलिस कर्मचारी पाळीत असल्याचे दिसून आले आहे.

पिडीत मुलीचे कुटुंब रोजमजुरी करणारे असून कामासाठी ते शिरडशहापूर येथे आले असता दि ९ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी दरम्यान आरोपी अजयकुमार मुलचंद श्रीनिवास वय ४० रा शिरडशहापूर ता औंढा नागनाथ जि हिंगोली ह मु बायफ रोड वाघोली ता हवेली जि पुणे याने त्याचे राहते घरी व लॉजवर नेऊन पीडीत तरूणीवर लग्नाचे आमिष दाखवून वारंवार बलात्कार केला. आरोपी पिडीत तरूणीला तू मला फार आवडतेस, तुझ्यासोबत मला लग्न करायचे आहे असे म्हणून लग्नाचे आमिष दाखवित पिडीत तरूणीच्या ईच्छेविरूध्द बळजबरीने वेळोवेळी शारीरिक संबंध करीत होता. याप्रकरणी पिडीत तरूणीने पोलिि ठाणे वाधोली जि पूणे शहर येथून सिसिटीएनएस मध्ये ऑनलाईन झिरोने गुन्ह दाखल केला होता.

दरम्यान, गुन्हा दाखल होऊनही या प्रकरणी औंढा पोलिस कमालीची गुप्तता पाळत होते परंतु पिडीत तरूणीच्या कुटुंबीयांनी आरोपीवर कारवाईची मागणी केल्यानंतर औंढा पोलिसांनी पिडीत तरूणीचे मेडीकल केले आहे. याप्रकरणी अजुनही आरोपीला अटक करण्यात आली नाही. पोलिस निरीक्षक जी एस राहीरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक एस के वाघमारे हे तपास करीत आहेत. याप्रकरणी सखोल तपास करण्याची तसेच आरोपीला तत्काळ अटक करण्याची मागणी पिडीत तरूणीच्या कुटुंबीयांनी पोलिसाकडे केली आहे.

हिंगोलीत संत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २४ फेब्रुवारी
राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संत गाडगे महाराज यांनी दिलेला स्वच्छतेचा मंत्र पाळण्याची शपथ घेण्यात आली.

छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांच्या नेतृत्वाखाली श्री संत गाडगे महाराज जयंती काढण्यात आली. राष्ट्रसंत साईनाथ महाराज यांच्या उपस्थितीमध्ये रॅलीला सुरुवात झाली. यावेळी जिल्हा रूग्णालयाचे जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ नितीन तडस, जिल्हाध्यक्ष पिंटू गोरे, उपजिल्हाध्यक्ष नारायण जाधव, युवा जिल्हाध्यक्ष सोमनाथ गायकवाड, सचिव राहुल पाईकराव, वर्षा खंदारे, मापारी ताई, शिवाजीराव दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती. धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान च्या वतीने गाडगे महाराज जयंती स्वच्छता अभियान करण्यात आले. येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रसंत, संत गाडगे बाबा यांची १४९ व्या जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. याप्रसंगी प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या हस्ते व उपस्थित सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रसंत संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संत गाडगेबाबा यांनी सर्वसामान्यांच्या सेवेसाठी केलेले कार्य व त्यांचे कल्याणकारी विचार या विषयावर प्रकाश टाकण्यात आला. यामध्ये थोर समाज सुधारक, लोकशिक्षणाचे चालते बोलते विद्यापीठ, विज्ञानवादी, स्वछतेचा संदेश देणारे, शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे, किर्तनातून माणूस घडविणारे, अनिष्ठ रूढी व शोषणाविरुद्ध प्रहार करून जागृती करणारे कर्मयोगी, राष्ट्रसंत, संत गाडगे बाबा होते. समाजातील सामाजिक सुधारणासाठी घेतलेली आग्रही भुमिका. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासोबत त्यांचे वैचारिक अतिशय दृढ असे संबंध होते. या विविध कार्याची व विचारांची माहिती प्रा डॉ सचिन हटकर यांनी विशद केली.

यावेळी प्रमुख उपस्थिती ज्येष्ठ प्रा.प्रो. डॉ. संजीवकुमार नरवाडे, मेजर पंढरीनाथ घुगे, स्टाफ सचिव डॉ प्रा सचिन हटकर, डॉ सोपान देव खरात, प्रा. डॉ सुभाष पोले, प्रा. पंडित कुऱ्हाडे, डॉ. महेश मगनाळे, प्रा. निलेश उबाळे, मुन्ना यादव व शेख जावेद, कु. सांची हटकर इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थीनी यांची उपस्थिती होती.